www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ६२ | सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




# महाराष्ट्र हे भारताचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल'

## नाविन्यपूर्ण कल्पना असणाऱ्या प्रत्येकाला नवउद्योजक बनण्याची संधी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्रॉंग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते.





मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी 1916 मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज आपण महिला सक्षमीकरण आणि नवकल्पनांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. राज्य शासनाने नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार केले आहे. तरुणांच्या स्वप्नांना पंख देण्याची सरकार आणि विद्यापीठांची भूमिका असून राज्य शासन प्रत्येक टप्प्यावर नवउद्योजकांना साहाय्य करीत आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे. एखादी कल्पना जेव्हा बाजारपेठेत रूपांतरित होते, तेव्हा ती अर्थव्यवस्थेला गती देते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्समुळे आता नव्या कल्पनांना वेग मिळत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमामुळे आज भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकॉनॉमी बनला असून लवकरच दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात महिला उद्योजकांनी विकसित केलेल्या नवकल्पनांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रदर्शनाची पाहणी करून सर्व नवोन्मेषकांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी वैद्यकीय, कृषी आणि वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट तीन स्टार्टअप कल्पनांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्री इन्क्युबेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात वेगाने काम होत असल्याचे सांगून येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असेल, असा विश्वास व्यक्त केला. शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात महिलांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख करून शासन एसएनडीटी विद्यापीठाच्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव यांनी प्रास्ताविकाद्वारे 'इनोव्हेशन महाकुंभ 2025' बाबत माहिती दिली.

---

# विक्रोळी पूर्व रिक्षा स्टँड वरील समस्या सोडविण्याचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी पूर्व, राम हजारे मार्ग आणि परेश पारकर मार्ग, टागोर नगर येथील स्थानिक रिक्षा चालक- मालक त्यांची रिक्षा ही रिक्षा स्टँडवर लावत नाही,त्यामुळे परिसरात भरपूर प्रमाणात गाड्यांची,माणसाची वर्दळ होऊन स्थानिक नागरिकांना चालण्यासाठी त्रास होत आहे, ह्याची तक्रार नागरिकांनी वाहतुक सल्लागार समितीचे सदस्य व दिशा वेल्फेअर ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी यांच्या कडे करण्यात आली. विक्रोळीकर विकास मंच यांच्या तर्फे ही निवेदन विक्रोळी वाहतुक विभागास देण्यात आले.



दिनांक ८.११.२०२५ रोजी विक्रोळी वाहतुक विभागाचे वरीष्ठ पोलीस अधीक्षक श्री. लांडगे यांनी नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबाबत राम हजारे मार्ग आणि परेश पारकर मार्ग टागोर नगर येथे भेट घेऊन परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील कार्यवाही बाबत आश्वासन दिले.

यावेळी वाहतुक सल्लागार समितीचे दिनेश बेरीशेट्टी , रविंद्र वाघमारे, झोहीब चुडावाला आणि विक्रोळीकर विकास मंच तर्फे राजाराम राव, आईवन डिसोझा, ओंकार परब, संजय, येलवे.आणि स्थानिक व्यापारी व नागरिक उपस्थित होते.

---

# मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दोन लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश




**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**

आदर्श शैक्षणिक समूह आणि पदवीधर प्रकोष्टच्या वतीने धनराज विसपुते यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दोन लाख 51 हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या उपस्थितीत दिला. यावेळी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अहोरात्र झटणाऱ्या मुख्यमंत्री यांच्या कार्यात खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाली हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा व समाधानाचा क्षण असल्याचे धनराज विसपुते यांनी सांगितले. हा धनादेश मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आला.

---

# ऑपरेशन सिंदूर हा खूप मोठा वळणबिंदू; भारताच्या धोरणासाठी निर्णय महत्त्वाचा ठरला - जनरल नरवणे

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली, प्रतिनिधी**

भारताच्या धोरणाच्या बाबतीत ऑपरेशन सिंदूर हा खूप मोठा वळणबिंदू आहे, असे माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे (निवृत्त) यांनी म्हटले आहे. शुक्रवारी मुंबईत झालेल्या सीएनबीसी-टीव्ही१८ ग्लोबल लीडरशिप समिट २०२५ मध्ये जनरल नरवणे बोलत होते.

जनरल नरवणे यावेळी म्हणाले की, भारताने हे स्पष्ट केले आहे की, ते दहशतवादी आणि दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांमध्ये फरक करणार नाही. आपल्या देशाच्या धोरणाच्या बाबतीत ऑपरेशन सिंदूर हा एक खूप मोठा वळणबिंदू आहे.

यामुळे जगाला हे दाखवून दिले आहे की आपल्याकडे केवळ राजकीय इच्छाशक्तीच नाही तर आपल्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही कृती किंवा ऑपरेशन्स करण्याची लष्करी क्षमता देखील आहे, असेही ते म्हणाले.



माजी लष्करप्रमुखांनी ड्रोन आणि मानवरहित प्रणालींसारख्या उदयोन्मुख क्षेत्रात क्षमता बळकट करण्याची गरज व्यक्त केली.

जनरल नरवणे म्हणाले की, रोमन जनरल व्हेगेटियस यांच्याकडून तुम्हाला शांतता हवी असेल तर युद्धासाठी तयार व्हा हे वाक्य त्यांच्या आवडत्या वाक्यांपैकी एक आहे.

कॅनडातील माजी राजदूत विकास स्वरूप म्हणाले की, ही कारवाई सीमापार दहशतवादाविरुद्ध "डोसियर्सपासून निर्णायक शक्तीकडे" एक बदल आहे.

---




---

# शिवसेना (उबाठा) पक्ष व वीर शैव कक्कया ढोर समाज मंडळ कामोठे यांची महत्वपूर्ण बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** आगामी पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कामोठे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व वीर शैव कक्कया ढोर समाज मंडळ कामोठे यांची महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली.वीर शैव कक्कया ढोर समाज मंडळ कामोठे यांच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यालयामध्ये महत्वाची बैठक झाली. याावेळी त्या मंडळाचे तरुण कार्यकर्ते व शिवसेना उप शहरप्रमुख व कामोठे प्रभाग 13 चे महानगरपालिकेचे उमेदवार सचिन मनोहर त्रिमुखे आणि मंडळाचे अध्यक्ष विलास बाबू खरटमोल



प्रभाग 11 चे उमेदवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तसेच शिवसेनेचे कामोठे शहर संघटक बबन गोळे आणि प्रभाग 13 चे विभाग अध्यक्ष बबन गोगावले यांनी निवडुकीच्या आधीची तयारी कशी करावी आणि कशा प्रकारे जनतेला संघटित करावे याबद्दल मार्गदर्शन केले. त्यावेळी मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# लग्नाच्या आमिषाने महिलेकडून १६ लाख उकळले;पोलिसांकडून भामट्याचा शोध सुरू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)**

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात राहणाऱ्या भामट्याने कामोठे परिसरातील एका महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याकडून १६ लाख रुपये उकळल्याची घटना समोर आली आहे. निलेश निफाडे पाटील असे त्याचे नाव असून, कामोठे पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरू केला आहे.या प्रकरणात फसवणूक झालेली महिला कामोठे येथे राहण्यास आहे. २०१८ मध्ये या महिलेने तिच्या लग्नासाठी आपले नाव लग्न जुळणाऱ्या वेबसाईटवर नोंदवले होते. दरम्यान, निलेश हा या महिलेच्या संपर्कात आला. त्याने या महिलेसोबत ओळख वाढवत तो एक व्यावसायिक असल्याचे या महिलेला सांगत तिच्या सोबत लग्न करण्यास इच्छुक असल्याचे सांगितले. दोघांमध्ये ओळख वाढल्यानंतर तो जून २०१८ ते जून २०२२ या कालावधीत या महिलेला पुणे रेल्वे स्टेशन परिसरात अनेकवेळा भेटला. त्यानंतर त्याने व्यवसायात विविध अडचणी आल्याचे सांगत तिच्याकडून थोडे थोडे करून १६ लाख रुपये उकळले. मात्र, जेव्हा ही महिला त्याच्याकडे पैशाची विचारणा करू लागली तेव्हा तो टाळाटाळ करू लागला व त्यानंतर त्याने या महिलेला टाळण्यासाठी त्याचा फोन बंद केला. या प्रकरणात निलेशने आपली फसवणूक केल्याचे या महिलेच्या लक्षात आल्यावर तिने कामोठे पोलीस ठाण्यात या प्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी निलेश पाटील याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे, मात्र प्राथमिक चौकशीत या गुन्ह्याची सुरुवात पुणे रेल्वे स्टेशन परिसरात झाल्याने त्यांनी हा गुन्हा पुढील तपासासाठी पुणे येथील बंडगार्डन पोलीस ठाण्यात वर्ग केल्याचे कामोठे पोलीस ठाण्याच्या वपोनि. विमल बिडवे यांनी सांगितले.

# निफाडच्या राजाबाबुंवर अभिनंदनाचा वर्षाव

## दोन्ही मुलं अक्षय व आंचल सी. ए. च्या परीक्षेत उत्तुंग भरारी

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक विनोद गायकवाड**

निफाड शहरातील मध्यमवर्गीय कुटुंबातून प्रचंड संघर्ष करत दोन्ही मुलांनी चार्टर्ड अकाउंटंट (सी.ए.) परीक्षेत यश मिळवून. निफाड शहरासह संपूर्ण तालुक्याचा मान उंचावला आहे. राजाबाबू आर्टचे संचालक आणि कलावंत म्हणून ओळखले जाणारे कुमार प्रमोद भिकूलाल शर्मा ( राजाबाबू ) यांचे सुपुत्र अक्षय व सुपुत्री आंचल यांनी हे यश संपादन केले आहे. अर्थार्जनासाठी अल्पवयात संघर्ष सुरू केलेल्या राजाबाबू यांनी आय.टी.आय.मधून शिक्षण घेत स्क्रीन पेंटिंग या क्षेत्रात काम सुरू केले. त्यांच्या कलात्मक हातातून निफाड शहरातील अनेक निमंत्रण पत्रिका जाहिराती आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना आकर्षक रूप प्राप्त झाले. पुढे काळाच्या बदलत्या गरजेनुसार त्यांनी "राजाबाबू आर्ट" या नावाने फ्लेक्स प्रिंटिंग व्यवसायाची सुरुवात केली. आणि निफाड मध्ये तंत्रज्ञानासह कला आणि कल्पकतेचा संगम घडवला. या प्रवासात त्यांना पत्नीची खंबीर साथ लागली दोन्ही मुलांची शिक्षण पूर्ण व्हावी म्हणून त्यांनी स्वतः अप डाऊन करत त्यांना नाशिक रोड येथे शिक्षणसाठी स्थायिक केले. याच काळात राजाबाबू आजारपणातून जात




असतानाही मुलांनी शिक्षण सोडले नाही.

वडिलांच्या सेवेत राहूनहीं अक्षय याने धैर्य आणि संयम दाखवला. तर आचलने सी.ए. परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन कुटुंबाचा अभिमान वाढवला. दोघांच्या या यशानंतर आता राजाबाबू मित्र परिवाराने कौतुक सोहळा आयोजित केला. असून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशाचे श्रेय राजाबाबू आणि त्यांच्या पत्नीच्या अथक परिश्रमांना मुलांच्या चिकाटीला आदरणीय गुरुवर्य वि.दा. व्यवहारे सर यांच्या आशीर्वादाला आणि श्री. स्वामी समर्थांच्या कृपादृष्टीला जाते. निफाडचा हा " राजाबाबू परिवार" आज संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# मुदखेड प्रभाग क्रमांक ४ मधून राधिका कपिल लोखंडे यांच्या उमेदवारीची चर्चा

## ■ शहराच्या विकासाचा 'नवा चेहरा' म्हणून नागरिकांकडून वाढता पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते**

मुदखेड शहराच्या विकासाला वेग देण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज असल्याची भावना व्यक्त होत असताना प्रभाग क्रमांक ४ मधून राधिका कपिल लोखंडे हे पुढे येत आहेत. शहरातील जनतेच्या प्रत्येक समस्येला प्राधान्य देणारा, सर्वांच्या आडचणी समजून घेणारा, सहज उपलब्ध आणि समर्पित कार्यकर्ता म्हणून त्यांची छाप गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांमध्ये उमटली आहे. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीबाबत राजकीय वर्तुळात तसेच स्थानिक नागरिकांमध्ये जोरदार चर्चा सुरु आहे.

सौ.राधिका लोखंडे यांचे पती कपिल केशवराव लोखंडे यांची राजकारणातील वाटचाल अत्यंत काटेकोर आणि समर्पित राहिली आहे. अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली १८ वर्षे निष्ठावान काम




करत, त्यांनी पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. भोकर विधानसभा आयटी सेल अध्यक्ष म्हणून सलग १० वर्षे त्यांनी पक्षाच्या डिजिटल मोहिमा, मतदार संपर्क आणि प्रचारयंत्रणा बळकट केली. त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश सचिव पदावर ६ वर्ष काम करताना राज्यभरातील अनेक कार्यक्रम, संघटनात्मक वाढ आणि युवकांना प्रेरित करण्याचे कार्य त्यांनी प्रभावीरीत्या पार पाडले.

विशेष म्हणजे, श्रीमती श्रीजयाताई अशोकराव चव्हाण यांच्या आमदारकी निवडणुकीदरम्यान कपिल लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बूथ क्रमांक २६७ वर भाजपाला विक्रमी ५८८ मते मिळवून दिली. हा विक्रम स्थानिक स्तरावर मोठ्या अभिमानाने पाहिला जातो आणि त्यामागील त्यांची मेहनत सर्वांनी ओळखली आहे.

याप्रभाग क्रमांक ४ मध्ये पाणीपुरवठा, रस्ते, नाल्या, प्रकाशयोजना, आरोग्यसुविधा, नागरिकांना प्रशासनाकडे योग्य वेळेत न्याय मिळवून देणे अशा स्थानिक प्रश्नांवर कपिल लोखंडे यांनी गेली अनेक वर्षे सातत्याने काम केले आहे. घराघरात संपर्क ठेवून सर्वसामान्यांच्या समस्या ऐकून घेणे, तत्काळ उपाय शोधणे आणि नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सतत पाठपुरावा करणे ही त्यांची विशेषता असल्याचे नागरिक सांगत आहेत.

स्थानिक नागरिक याबाबत उत्साहाने चर्चा करताना म्हणतात, "या सामान्य पण समर्पित कार्यकर्त्याला आता नगरसेवक पदाची संधी मिळायलाच हवी. प्रभागाच्या विकासाचा मार्ग कपिल लोखंडेच दाखवू शकतात."

तत्कालीन परिस्थितीत प्रभागात त्यांच्या नावाची जोरदार चर्चा होत असून सर्व स्तरातील नागरिकांकडून मिळणाऱ्या वाढत्या पाठिंब्यामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकीत त्यांची उमेदवारी निश्चित होणार की काय,असा सवाल राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे.राधिका कपिल लोखंडे यांच्या उमेदवारीने प्रभाग क्रमांक ४ च्या विकासाला नवा वेग मिळण्याची आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# लासुर्णे – सणसर गटातून मा सागर भिसे यांना उमेदवारी मिळावी म्हणून मतदारांचे नेत्यांना साकडे

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

**लासुर्णे** - सणसर जिल्हा परिषद गटातून आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत तसेच बेलवाडी गावचे युवा उदयोजक मा सागर बाळासाहेब भिसे यांना ग्रामस्थांचा जोरदार प्रतिसाद व वाढता पाठिंबा मिळत आहे. त्यांच्या सामाजिक कार्यशैलीमुळे, लोकसंपर्काच्या माध्यमातून आणि प्रामाणिक नेतृत्वामुळे ग्रामीण भागात मा सागर भिसे यांच्या विषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. सागर भिसे यांनी सामाजिक काम करत असताना अनेक विकासकामे मामाच्या माध्यमातून पूर्ण केली आहेत.शेतकऱ्यांसाठी लागणाऱ्या सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.त्यामुळे ग्रामस्थ त्यांच्या उमेदवारीवर समाधानी असून, "विकासाचे ध्येय असलेला खरा तरुण नेता" अशी त्यांची या गटात ओळख आहे.या गटातील युवा तरूण वर्ग महिला मंडळे आणि शेतकरी बांधवांकडून सागर भिसे यांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे ग्रामस्थांच्या म्हणण्या नुसार,"सागर भाऊ हे व्यवहारात प्रामाणिक नेहमी जनतेच्या अडचणीत धावून



जाणारे व्यक्तिमत्व आहे.अशा व्यक्तीलाच जिल्हा परिषदेसारख्या जबाबदारीच्या पदावर पाहायला हवं अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली दरम्यान इंदापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनीही सागर बाळासाहेब भिसे यांच्या नावाला पाठिंबा दर्शविला असल्याची गोपनीय माहिती मिळत आहे पक्षात निष्ठावंत म्हणून त्यांनी अनेक वर्षे संघटन बांधणी ग्रामीण समस्या सोडविणे आणि युवकांना समाजकारणात दिशा देण्याचे काम केले आहे.आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत लासुर्णे सणसर गटातून सागर भिसे यांचे नाव संभाव्य दावेदार म्हणून पुढे येत असून त्यांच्या उमेदवारीला ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे.सागर भिसे हे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे एकनिष्ठ कट्टर कार्यकर्ते मानले जातात. शांत,संयमी, व्यक्तीमहत्व म्हणूनच त्यांची राजकारणात ओळख आहे. लासुर्णे - सणसर जि.प .गटातून राष्ट्रवादी (अजित पवार गटाच्या) माध्यमातून जिल्हा परिषद सदस्य पदासाठी सागर भिसे यांना उमेदवारी देण्यात यावी अशी या गटातील तमाम सर्वसामान्य जनतेतून मागणी केली जात आहे.जनतेच्या विकासाच्या आशा-अपेक्षा पूर्ण करणारा उमेदवार म्हणून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते सागर भाऊ भिसे यांच्या नावाची जोरदार चर्चा संपूर्ण गटात सुरु आहे.

# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ बालभारतीच्या सेतू अभ्यास निर्मिती समितीवर योगेश ढवारे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

सेलू येथील श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयाचे राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक योगेश ढवारे यांची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, बालभारती पुणे यांच्या सेतू अभ्यास (ब्रिज कोर्स) निर्मिती समितीवर तज्ञ सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

या निवडीसंबंधीचे पत्र महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे येथील शिक्षण उपसंचालक मा. अरुण जाधव यांनी पाठविले आहे.

आगामी शैक्षणिक



वर्षापासून इयत्ता 3 री, 4 थी आणि 6 वी च्या अभ्यासक्रमात बदल होणार असून, त्या अनुषंगाने सेतू अभ्यास पुस्तिका तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) व बालभारती पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे. या संदर्भात विविध विषयांच्या तज्ज्ञ समित्या गठित करण्यात आल्या असून, इयत्ता सहावी इतिहास विषयासाठी योगेश ढवारे यांची निवड करण्यात आली आहे.

ढवारे यांच्या या निवडीबद्दल परभणी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी सविता बिरगे, प्राथमिक शिक्षणाधिकारी सुनिल पोलास, उपशिक्षणाधिकारी तथा सेलू गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, केंद्रप्रमुख एकनाथ जाधव, के.बा. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिरुद्ध जोशी, सचिव महेश खारकर, मुख्याध्यापक संजय धारासुरकर, तसेच सिद्धार्थ एडके आदींनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# "तर्कशक्तीचा चमत्कार,अध्यात्माचा अविष्कार!"

## पाटोद्यातील राजेंद्र 'लोखंडे महाराज' यांना 'समाजरत्न' पुरस्काराने गौरव!

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**

पाटोदा तालुक्यातील अध्यात्म, तर्कशास्त्र आणि भाकीतशक्तीचा अद्भुत संगम असलेले व्यक्तिमत्व - राजेंद्र गंगाराम लोखंडे उर्फ लोखंडे महाराज - यांना त्यांच्या विलक्षण कार्य,अद्वितीय तर्कशक्ती आणि समाजातील योगदानाबद्दल 'समाजरत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे. दिघोळ (ता.पाटोदा) येथील रहिवासी असलेले लोखंडे महाराज काही वर्षांपूर्वी शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने पाटोद्यात स्थायिक झाले. शालेय जीवनापासूनच अध्यात्मिक प्रवृत्ती असलेले महाराज हे खेमानंद महाराज यांचे शिष्य असून,पुढे ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत त्यांनी कार्य केले. एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण करूनही त्यांचे लक्ष सदैव अध्यात्म आणि आत्मज्ञानाकडेच केंद्रित राहिले.

ब्रहमचारी जीवन जगणारे लोखंडे महाराज यांच्याकडे एक अद्भुत तर्कशक्ती आहे - समोर आलेल्या व्यक्तीचा चेहरा पाहताच ते त्या



व्यक्तीची जन्मतारीख,वार,आणि भविष्यातील घटनांचा वेध अचूकपणे सांगतात.

त्यांनी २०२० सालीच भाकीत केले होते की, "आ.धनंजय मुंडे आणि लोकनेत्या पंकजाताई मुंडे मार्च २०२४ मध्ये पुन्हा राजकारणात एकत्र येतील", आणि हे भाकीत चपखल खरे ठरले!

महाराजांना भूतकाळ आणि भविष्यकाळातील सण,वार आणि तारखा अगदी अचूक सांगण्याची चमत्कारिक किमया अवगत आहे. उदाहरणार्थ - २०४० साली ४ नोव्हेंबरला दिवाळी रविवार असेल,२०५५ साली २४ फेब्रुवारीला महाशिवरात्री बुधवार असेल,१९४७ साली ६ मार्चला होळी बुधवार होती,तर स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट शुक्रवार होता -


अशा शेकडो उदाहरणांतून त्यांच्या अद्वितीय ज्ञानाची प्रचिती येते.

राज्याच्या राजकारणापासून मानवाच्या आयुष्यापर्यंत - तर्क,श्रद्धा आणि अध्यात्म यांचे अनोखे मिश्रण मांडणारे लोखंडे महाराज हे आजच्या पिढीसाठी आदर्श आणि प्रेरणास्थान ठरत आहेत."चेहऱ्यातून जाणणारे भविष्य, तर्कशक्तीतून उलगडलेले सत्य - पाटोद्यातील लोखंडे महाराज ठरले खरे 'समाजरत्न'!"

# काशिद किनाऱ्यावर शासन झोपेत; मुख्यमंत्री फडणवीस, पर्यटक सुरक्षेसाठी ठोस पावलं कधी ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

काशिद किनाऱ्यावर काळाने घेतले दोन जीव शिक्षक विद्यार्थ्याचा अंत, एक गंभीर शासनाच्या निष्काळजीपणावर जनतेचा संताप, मुख्यमंत्री फडणवीसांनी उत्तर द्यावे जनतेची जोरदार मागणी.रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध काशिद समुद्रकिनाऱ्यावर शनिवारी पुन्हा काळाचा घाला. सहलीवर आलेल्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला, तर एक विद्यार्थी जीवाच्या आकांतात रुग्णालयात उपचार घेत आहे. अकोल्यातील शॉरवीन क्लासेसच्या या गटाचा आनंद क्षणात शोकांतिका ठरला आणि पुन्हा एकदा अलिबाग मुरुड समुद्रकिनाऱ्यांवरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.राम विठ्ठल कुटे (वय 60, शिक्षक) आणि आयुष रामटेके (वय 19, विद्यार्थी) या दोघांचा अंत झाला, तर आयुष बोबडे (वय 17) याला स्थानिकांनी



जीवाच्या आकांताने वाचवले. मात्र या घटनेनंतर लोकांचा रोष उसळला आहे प्रत्येक काही महिन्यांनी हेच चित्र, पण शासन मात्र डोळ्यावर झापडं ठेऊन बसले आहे!गेल्या काही वर्षांत रायगड किनाऱ्यावर बुडालेल्या पर्यटकांची संख्या शेकड्यांमध्ये गेलेली आहे. तरीही सुरक्षारक्षक अपुरे, चेतावणी फलक निष्क्रिय, लाईफ जॅकेटची सोय नाही, आणि आपत्कालीन बचाव पथके केवळ कागदोपत्री! प्रशासनाच्या निष्क्रियतेने किनारा 'मौतचा किनारा' बनला आहे.राज्य सरकारने काशिद, मुरुड, अलिबाग यांसारख्या पर्यटन ठिकाणांसाठी कोट्यवधींच्या जाहिराती झळकवल्या, पण पर्यटकांचा जीव वाचवण्याच्या प्राथमिक उपाययोजनांवर मात्र शून्य लक्ष. ही शोकांतिका केवळ 'दुर्दैवी अपघात' नसून शासनाच्या बेफिकिरीचा थेट पुरावा आहे.अकोला आणि रायगड जिल्ह्यात शोककळा पसरली असली तरी जनतेत आता असंतोष उफाळला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लोकांचा सरळ सवाल समुद्र किनाऱ्यांवर सुरक्षेची कायम स्वरूपी व्यवस्था कधी होणार? पर्यटन वाढवायचे असल्याचे बोलणारे सरकार, पर्यटकांचे जीव मात्र धोक्यात का घालत आहे?फक्त अपघात झाल्यानंतर प्रतीकात्मक रक्षक नेमणे, रुग्णालयात फोटो काढणे, आणि नंतर पुन्हा गप्प बसणे ही प्रशासनाची ठरलेली ढिलाई आहे. आता लोकांना शब्द नकोत, कृती हवी आहे.राज्य शासनाचे कान टोचले गेले पाहिजेत. कारण आता प्रत्येक बुडणारा जीव हा फक्त निसर्गाचा नव्हे, तर शासनाच्या मृतप्राय प्रणालीचा बळी आहे.

# रेवदंड्यात पहाटेचे मोहक दृश्यः धुक्याच्या चादरीत हरवलेले सौंदर्य

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : पहाटेच्या मखमली शांततेत रेवदंडा निसर्गाचा मोहक देखावा अनुभवत आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरावर दाट धुके पसरू लागले असून, गुलाबी थंडीच्या प्रारंभासोबतच या सागरी नगराने स्वतःला एका स्वर्गीय रूपात सजवून घेतले आहे.पहाटेच्या वेळी समुद्राच्या किनाऱ्यावर पसरलेले धुके, त्यातून उमटणारे सोनेरी सूर्यकिरण, आणि थंडगार वाऱ्याच्या झुळका या सर्वांनी रेवदंड्याला जणू निसर्गदेवतेची कृपा लाभली आहे. किनाऱ्यावर प्रॅक्टिससाठी धावणारी बैलजोडी, मच्छीमारांची बोटी बांधणारी घाई-गडबड, आणि त्याच दृश्यात रमलेले पर्यटक हे सर्व मिळून एक



अप्रतिम जिवंत चित्र तयार करतात. हरित झाडांवर बसलेले पक्ष्यांचे किलबिलाट, ओलसर वाळूचा सुगंध आणि धुक्याच्या आडून झाकून-उघडणारा समुद्र या अनुभवाने प्रत्येक मनात एक वेगळाच सुकून मुरतो. या वातावरणात रेवदंडा जणू निसर्गाची सजीव कविता बनला आहे.निसर्ग इथे कधी शांत, कधी उत्साही, तर कधी त्याच्या रौद्र-रम्य रुपात जाणवतो. पण या दिवसांत दिसणारे धुक्याचे प्रेमळ आवरण संपूर्ण परिसराला एक अलौकिक मोहकता प्रदान करत आहे. हे दृश्य पाहण्यासाठी स्थानिक आणि पर्यटक दोघेही पहाटे उठून किनाऱ्याची वाट धरत आहेत. रेवदंड्याचं हे रुप आता केवळ निसर्गप्रेमींच्याच नव्हे, तर छायाचित्रकारांच्या आवडत्या ठिकाणांपैकी एक बनत चाललं आहे.रेवदंड्यातील हा धुक्याचा साज आणि समुद्रकिनाऱ्यावरील जीवनाचा हा संगम मनाला भिडणारा आहे. या दिवसांचा प्रत्येक सकाळचा क्षण म्हणजे निसर्गाशी संवाद साधण्याची संधी आणि हाच रेवदंड्याच्या सौंदर्याचा आत्मा आहे.

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या मुंबई प्रादेशिक विभागाचे, आठवे द्वैवार्षिक अधिवेशन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई / प्रतिनिधी**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या मुंबई प्रादेशिक विभागाचे आठवे द्वैवार्षिक अधिवेशन ७ नोव्हेंबर २०२५ रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात उत्साही वातावरणात पार पडले. महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान फेस्कॉम चे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी भूषविले.

या कार्यक्रमात अभिनेते प्रशांत दामले यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रसंगी आईस्कान चे अध्यक्ष दिगंबर चापके, फेस्कॉमचे माजी अध्यक्ष अरुण रोडे, मुंबई विभाग फेस्कॉमचे अध्यक्ष सुरेश पोटे, कार्यकारणी सदस्य व महाराष्ट्रातील पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्व मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष सुरेश पोटे यांनी केले व कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आव्हान केले.

जेष्ठ व्यक्तीं ने उर्वरित जीवनात शांत राहणे , ध्यान करणे, छंद जोपासणे, आनंदी राहणे असे मत लोकप्रिय अभिनेते प्रशांत दामले यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केले.

उपस्थितांशी संवाद साधताना गणेश नाईक म्हणाले की आज ज्येष्ठांच्या बाबतीत हिंसाचाराच्या अनेक घटना घडत आहेत. मुलांनी




ज्येष्ठ व्यक्तींना त्रास न देता त्यांचा सांभाळ करावा. आजची मुले उद्याचे ज्येष्ठ नागरिक आहेत. याचे भान त्यांनी ठेवावे. असं सांगून ते म्हणाले की, ज्येष्ठांच्या हिंसाचाराच्या विषयावरती उत्तम नाटक प्रशांत दामले यांनी घेऊन यावे. त्यांना जे काही सहकार्य लागेल ते आम्ही देऊ.

नवी मुंबई हे ज्येष्ठ नागरिकांना राहण्यासाठी परिपूर्ण असे शहर आहे. नवी मुंबईत ज्येष्ठांसाठी अनेक विरंगुळा केंद्र आहेत. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेत ज्येष्ठांसाठी एक कक्ष आहे . असे अण्णासाहेब टेकाळे यांनी सांगितले.माधवबागचे डॉक्टर मिलिंद सरदार यांनी ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या हृदयाची काळजी कशी घ्यावी याविषयी सखोल माहिती दिली. त्याचप्रमाणे अपोलो हॉस्पिटल, माधवबाग, पितांबरी व संजीवनी ब्लड ग्रुप ॲप यांनी आपला सहभाग दर्शवून ज्येष्ठांना उपयोगी अशी आरोग्य विषयक माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी देशपांडे यांनी खूप सुंदरपणे केले. अधिवेशन पार पडण्यासाठी शरद डिचोलकर, प्रतिभाताई सराफ, स्वातीताई फडके, लत्ताताई पोवार, श्रीराम शिवडेकर, दिलीप गाडेकर, दिलीप धारकर, बळवंत पाटील यांनी सहकार्य केले. राष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## पृथ्वीराज जाचक लासुर्णे व मुरलीधर निंबाळकर सणसर गणातून ठरणार किंगमेकर


### सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटात यावेळी येणार राष्ट्रवादीकडे

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

पुणे जिल्ह्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांनी जोर धरू लागला असून पहिल्या टप्पात महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायत यांची घोषणा निवडणुक आयोगाने जाहीर केली असली तरी नंतर होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समित्याची निवडणूकीत इच्छुक असणारे कार्यकर्ते आपली उमेदवारी फिक्स करण्यासाठी आपआपली सेटिंग आतापासूनच स्थानिक गाव पुढारी यांच्याकडे जाऊन गाठी भेटी घेऊन उमेदवारी आपल्याच कशी मिळेल याकडे लक्ष देऊ लागले आहेत असे चित्र इंदापूर तालुक्यातील पश्चिम भागात सध्या तरी नक्कीच पहायला मिळत आहे.

इंदापूर तालुक्यातील अति सवेनंदशील जिल्हा परिषद गट म्हणून सणसर लासुर्णे गटाकडे पाहिले जाते मागील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणूकीत हा गट सत्ताधारीनां आपल्या बाजूला वळवता आला नव्हता त्यावेळेची परिस्थिती वेगळीच होती आणि आता वेगळीच आहे

मागील निवडणुकीत अजितदादा पवार गटाकडे श्री छत्रपती कारखान्याचे विद्यमान अध्यक्ष मा. पृथ्वीराज जाचक हे लासुर्णे गणात सोबत नव्हते तशीच परिस्थिती सणसर गणात सुद्धा होती




त्यावेळी श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष मुरलीधर निंबाळकर हे सुद्धा अजितदादा पवार यांच्यासोबत नसल्याने या जिल्हा परिषद व पंचायत समिती गटातील राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे उमेदवार यांना हार पत्कारावी लागली होती यानिवडणुकीत आता दोन्ही नेते अजितदादा पवारांकडे आल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची ताकत नक्कीच वाढली असून या निवडणुकीत चित्र वेगळं दिसणारआहे

असे जाणकार नागरिकांमध्ये चर्चा असून लासुर्णेतुन पृथ्वीराज जाचक व सणसर मधून मुरलीधर निंबाळकर हे दोन मोठे नेते परत अजितदादा गटात आल्यामुळे यावेळी हा गट नक्कीच राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाकडे येणार असल्याची चर्चा गावागावात जोर धरू लागली असल्यामुळे या निवडणुकीत नक्कीच राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाला यश मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

# इनरव्हील क्लबच्या वार्षिक कार्यकाळातील महत्वाचा टप्पा

### डिस्ट्रीक्ट चेअरमन विजीट अतिशय उत्तमरित्या पार पाडण्यात इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: इनरव्हील क्लब ही एक सामाजिक महिला संस्था असुन इथे वेगवेगळ्या स्तरांत कार्यरत असणाऱ्या महिला एकत्र येऊन समाजकार्य करतात . ही संस्था मुख्यतः ग्रामीण, जिल्हा, राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय अशा चार पातळ्यांवर काम करते . व ही कामे अतिशय पारदर्शी व नियमबद्ध पद्धतीने केली जातात त्याचाच एक भाग म्हणून जिल्हाच्या प्रमुख त्या जिल्ह्यातील सर्व क्लबना भेट देऊन त्यांच्या कामाची पडताळणी करतात .त्याच अनुषगांने डिस्ट्रीक्ट 313 च्या 2025-26 च्या चेअरमन डॉ . आशा देशपांडे यांनी इनरव्हील



क्लब ऑफ पनवेल सिटीला भेट देऊन त्यांच्या कामकाजाची पहाणी केली . यावेळी ब्लबच्या प्रेसिडेंट सौ . सिंपल आंचलिया , सेक्रेटरी सौ . युक्ती शहा, खजिनदार सौ . ममता ठक्कर , प्रोजेक्ट चेअरमन तसेच झेड ए .सी सौ ध्वनी तन्ना ,पास्ट प्रेसिडेंट सौ. प्रतिभा डांगी, चार्टर प्रेसिडेंट सौ . हेतल बालड, वाईस प्रेजिडेंट सौ . नम्रता बांठीया . एडिटर सौ . मोसमी गोगुला, आयएसओ सौ .स्नेहल कल्याणकर, सीसी सौ . प्रिया चतुर्वेदी, जॉईन्ट सेक्रेटरी सौ . वैशाली कटारिया, कार्यकारिणी सदस्या सौ . विजयता कोठारी अशा सर्व कार्यकारिणी तसेच क्लबच्या इतर सदस्यांच्या उपस्थितीत ही भेट अतिशय व्यवस्थीतरीत्या पार पडली . नुकतीच दिवाळी पार पडल्याने दिवाळी हीच थीम घेऊन क्लबने दिव्यांच्या प्रकाशात डीसी डॉ . आशाजी यांचे संगीतमय स्वागत करून दिपप्रज्वलनाने कामकाजाची सुरवात केली . अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात डीसी सर्व कार्यकारिणी सदस्यांच्या कामकाजाची अतिशय बारकाईने पाहणी करून त्यांच्या कामाचे कौतुक केले . तसेच त्यांनी आपले मौलिक मार्गदर्शन अतिशय मुद्देसुद व मोजक्या शब्दांत क्लबसमोर मांडले ज्याचा फायदा क्लबला भविष्या त आपले काम अजुन उत्तमरित्या करण्यासाठी नक्की होईल यात शंका नाही . यावेळी परंपरे प्रमाणे क्लब मार्फत सौ सिंपल व सौ . विजयता यांनी प्रत्येकी 3 - 3 हजार या प्रमाणे 6 हजार रुपयांची धनराशी दोन मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी आर .जे . शंकरा हॉस्पीटलला दिली . तसेच क्लब मार्फत पनवेल मधील नवकार युवक ग्रुप या संघटनेला ते करत असलेल्या डायलिसीस च्या सेवेसाठी 11000/- रुपयाची मदत करण्यात आली . अशा पद्धती ने क्लब ला सामाजिक बांधीलकी जपत अवघ्या चार महिन्यांत 50 प्रोजेक्ट पूर्णकरण्याची कौतुकास्पद कामगिरी पार पाडण्यात तसेच डी .सी मॅडम डॉ . आशाजीं ची कौतुकाची थाप मिळवण्यात यश आले . डिस्ट्रीक्ट चेअरमन डॉ . सौ . आशाजींनी प्रसिडेंट तसेच क्लब ला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व क्लब प्रेसिडेंट सौ. सिंपल यांनी कार्यकारिणी तसेच इतर सदस्यांना त्यांनी वेळोवेळी दिलेल्या अनमोल पाठिंब्यासाठी सर्वांचे मनापासून आभार मानले .

## आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेश ची उद्या सोमवार दिनांक १० नोव्हेंबर रोजी महत्वपूर्ण बैठक

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले मार्गदर्शन करणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल आनंद पवार:**

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेशची महत्वपूर्ण बैठक उद्या सोमवार दिनांक १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सांताक्रुझ पूर्व कालिना येथील भीमछाया सांस्कृतिक केंद्र येथे आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीस रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.या बैठकीस मुंबईतील सर्व प्रमुख रिपब्लिकन नेत्यांनी राष्ट्रीय राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी प्रमुख कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी सर्व जिल्हा तालुका आणि वॉर्ड अध्यक्षांनी,महिला, युवक आणि सर्व आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी केले आहे.

## उमरखेड तालुक्यातील मराठा आरक्षणाचा चेहरा नरेंद्र सूर्यवंशी राजकीय मैदानात उतरणार

**दैनिक युवक आधार**
**राजू गायकवाड उमरखेड तालुका प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत पोफाळी जिल्हा परिषद गणात सध्या बऱ्याच उमेदवारांची रस्सीखेच चालू आहे त्यामध्ये आता नवीन चेहरा बघायला मिळणार आहे तो म्हणजे उमरखेड तालुक्यातील मराठा आरक्षणाच्या चेहरा असणारे उमरखेड तालुक्यातील मूक मोर्चाचे नेतृत्व करणारे नरेंद्र सूर्यवंशी एकेकाळी आपल्या कर्तृत्वाने व नेतृत्वाने फक्त तालुका स्नायूतर जिल्हा गाजवून सोडणारे. कुठलाही राजकीय



वारसा लाभलेला नसताना गावच्या प्रगतीसाठी अनेक कामे केली त्याचबरोबर सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे आता राजकीय वाटचाल करणार असल्याचे त्यांनी सांगितले इच्छुक उमेदवार असून त्यांना विविध पक्षाची ऑफर सुद्धा येत आहे. सध्या ते कोणत्या पक्षाकडून लढतील किंवा कोणाला पाठिंबा दर्शवतील हे स्पष्ट झाले नाही परंतु आता ते राजकीय रिंगणात उतरणार हे मात्र निश्चित झाले आहे.

त्यामध्ये आणखीन एक टाकी माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर व माजी आमदार विजय खडसे यांचे अतिशय निकटवर्तीय समजले जाणारे.

## नांदेडमध्ये भव्य काँग्रेस पक्षप्रवेश सोहळा

### खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश आनंदमाणिकराव सागर काँग्रेसमध्ये प्रवेश नांदेड वाघाळा महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आज प्रभाग क्रमांक 4 येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळयात आनंद माणिकराव सागर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. हा सोहळा जिल्ह्याचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला

या प्रसंगी माजी आमदार माधवराव पाटील जळगावकर शहराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेशदादा गायकवाड, राजेश पावडे जिल्हाध्यक्ष दक्षिण नांदेड, माजी उपमहापौर आनंदराव पाटील चव्हाण, तिरुपती पाटील कोंडेकर, एकनाथराव मोरे साहेब, माजी नगरसेवक किशोर भवरे, कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, डॉ. धनराज इंगळे, आदेश सूर्यवंशी, प्रवीण कानगुले,



मुक्तार भाई, अजय एडके, रेहान भाई, सगर मामा, गणेश कोकाटे, अनिकेत लोणे लहानकर आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी आनंद माणिकराव सागर यांच्या काँग्रेस प्रवेशाचे स्वागत करत त्यांना पक्षाच्या विचारधारेत कार्यरत राहून नांदेड शहराच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले. खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी यावेळी बोलताना सांगितले की काँग्रेस हा सर्वसामान्यांचा पक्ष आहे. नांदेडच्या जनतेच्या हितासाठी आपण सर्वजण एकजुटीने काम करूया म्हणाले

# इमारतीच्या बांधकामासाठी घेतला जातोय वृक्षाचा बळी

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम १९६४ अंतर्गत परवानगी न घेता जवळपास १०० वर्ष जुन्या पिंपळाच्या झाडाला इमारतीच्या बांधकामासाठी तोडण्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.

कैलास ज्वेलर्स समोर,लालचक्की चौक,स्टेशन रोड,उल्हासनगर -४ येथे १०० वर्ष जुने पिंपळाचे झाड सुरेश नायडू इसमाच्या वतीने इमारतीच्या बांधकामासाठी तोडले जात असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचा भोंगळ



कारभार चव्हाट्यावर आला आहे.

प्राप्त माहितीनुसार सुरेश नायडू या इसमाकडून इमारतीच्या बांधकामासाठी नगररचना विभागात बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असून बांधकाम परवानगी अद्यापही प्रलंबित असताना सुद्धा केवळ प्रस्तावित इमारतीच्या बांधकामामध्ये सदरील पिंपळाचे झाड अडथळा ठरत होते.

यामुळे आज सकाळी ते झाड तोडण्याचा प्रयत्न केला गेला याविरोधात सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्रमांक -४ यांना सूचना देण्यात आली असून विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनमध्ये कळविण्यात आले असल्याची माहिती समाज सेवक किरण पडवळ यांनी दिली.

## मोटारसायकलीची झाली चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल जवळील मॅरेथॉन नेक्सान, ॲन्टेलीया बिल्डींग येथील बी वन पार्कींग पळस्पे येथून एका मोटारसायकलीची चोरी झाल्याची घटना घडली असून याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे .बळीराम रामदास बागवाले यांनी त्यांची १०,०००/-रु किंमतीची काळ्या रंगाची हिरो होन्डा कंपनीची पेंशन प्रो मोटारसायकल क्रमांक MH 46 46 Q 9114 ही बिल्डींगच्या पार्किंगमध्ये पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे.

## नगर परिषदेच्या कमला नेहरू बंद बालवाडीत कचऱ्याचे घाणीचे साम्राज्य; नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

नगरपरिषदेच्या वालुर रोडवरील कमला नेहरू बंद बालवाडी परिसरात सध्या कचऱ्याचे आणि घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही बालवाडी गेल्या अनेक वर्षांपासून बंद आहे. देखभालीअभावी इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, परिसर ओसाड झाला आहे. काही निष्काळजी नागरिकांनी येथे घरगुती तसेच प्लास्टिकचा कचरा टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे परिसरात अस्वच्छता,



दुर्गंधी आणि डास-माशांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

बालवाडीच्या मागील बाजूस अल्पसंख्याक मुलींसाठीचे वसतिगृह असून, त्याच रस्त्यावर अलीकडेच स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे स्थलांतर झाले आहे. त्यामुळे या परिसरातून जाणाऱ्या नागरिकांना तसेच वसतिगृहातील विद्यार्थिनींना दुर्गंधीचा आणि अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, इमारतीची सुरक्षा भिंत कोसळलेली असून ती पुन्हा उभारण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. त्यांनी सांगितले की नगर परिषदेकडे वारंवार तक्रारी केल्या असूनही अद्याप कोणतीही साफसफाई अथवा कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगर परिषदेच्या निष्क्रीय भूमिकेबद्दल नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.नागरिकांनी प्रशासनाला तातडीने लक्ष घालून परिसरातील कचरा हटवावा, स्वच्छता मोहीम राबवावी तसेच या बंद पडलेल्या बालवाडीच्या जागेचा योग्य आणि सार्वजनिक उपयोग करावा, अशी ठाम मागणी केली आहे.

# शिरूर तालुक्यातील यशवंत फुलमाळीची गरुडझेप!; अडथळा शर्यतीत विभागात प्रथम

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार , प्रतिनिधी**

तालुक्यातील सिंदफणा आश्रम शाळेचा विद्यार्थी यशवंत भारत फुलमाळी या विद्यार्थ्याने १४ वर्षे वयोगटात अडथळा शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या व तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या दिमाखदार विजयामुळे यशवंतची थेट राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

मानवत जिल्हा परभणी येथे झालेल्या विभागीय स्तरावरील शालेय ८० मीटर हर्डल्स (अडथळा शर्यत) स्पर्धेत बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील यशवंत भारत फुलमाळी या विद्यार्थ्याने १४ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यशवंतच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे त्याचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. कठोर मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाचा परिणाम या यशामागे त्याची स्वतःची कठोर मेहनत तर आहेच, पण त्याला लाभलेले योग्य मार्गदर्शनही तेवढेच महत्त्वाचे ठरले.



संग्राम सेवाभावी संस्थेचे सचिव राजकुमार पालवे आणि शाळेचे मुख्याध्यापक श्री. किशोर गुंड सर तसेच माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. गहिनीनाथ खरमाटे सर यांचे अनमोल मार्गदर्शन त्याला लाभले. शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. गणेश जायभाये सर आणि सुनील तावरे सर यांनी त्याला खेळाचे अचूक प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले. आश्रम शाळेचे सहशिक्षक महादेव कातखडे सर यांनी त्याला योग्य आहाराचे मार्गदर्शन करून त्याची शारीरिक क्षमता वाढविण्यात मदत केली.

यशवंतच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल त्याला शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि पालकांकडून भरभरून शुभेच्छा मिळत आहेत.

प्राथमिक व माध्यमिक शाळेचे शिक्षक देवराव मस्के सर, विजय आंधळे सर, संजय ढाकणे सर, कल्याण उनवणे सर, किशोर खरमाटे सर, अशोक काटे सर, सचिन खंदारे सर, रमेश जायभाये सर, कचरू नेटके सर, सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग यांनी यशवंत फुलमाळी याला पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देत त्याचे अभिनंदन केले.

**राज्यस्तरावरही चमकेल**

सिंदफणा आश्रमशाळेच्या या विद्यार्थ्याने विभागीय स्तरावर मिळवलेल्या घवघवीत यशामुळे आश्रमशाळेचे नाव उज्वल झाले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतही तो अशीच उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास मुख्याध्यापक व शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

### समाज एकतेचा नवा इतिहास रचला

# गालसुरे विभाग कुणबी समाज सभागृहाचे आ. आदिती तटकरे यांच्या हस्ते भव्य उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित**

श्रीवर्धन समाजाच्या प्रगतीचा आणि ऐक्याचा नवा अध्याय लिहित गालसुरे विभाग कुणबी समाजाच्या २० गावांच्या सामाजिक संस्थेच्या वतीने उभारण्यात आलेल्या कुणबी समाज सभागृहाचे , दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी आमदार आदिती ताई तटकरे यांच्या शुभहस्ते भव्य उद्घाटन संपन्न झाले.या ऐतिहासिक सोहळयाला तालुक्यातील कुणबी समाजाचे सर्व पदाधिकारी, समाजबांधव तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकतेचा आणि अभिमानाचा संदेश दिला.उद्घाटनानंतर आपल्या मनोगतात बोलताना आमदार




आदिती तटकरे म्हणाल्या — "समाज, जात, धर्म यांचा विचार न करता सर्वांना समानतेने न्याय देणे हेच आमचे ध्येय आहे. श्रीवर्धन मतदारसंघातील जनतेच्या प्रेमामुळेच मला आमदार म्हणून निवडून येण्याची आणि मंत्रिपद भूषवण्याची संधी मिळाली. हे समाज भवन म्हणजे फक्त एक इमारत नसून समाजाच्या आत्मसन्मानाचे प्रतीक आहे."गालसुरे विभागातील हे समाज सभागृह हा आर्थिक आणि सामाजिक उन्नतीचा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास तटकरे यांनी व्यक्त केला. सभागृहाला ग. स. कातकर साहेब यांचे नाव देण्यात आले असून, त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, तटकरे यांनी तालुक्यातील भातशेतीच्या नुकसानीचा विषय उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामे तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश दिले आणि शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन दिले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन कुणबी समाज सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केले. कार्यक्रमस्थळी आनंद, एकता आणि उत्साहाचे वातावरण होते.

## नवनाथ बाबा अहिरे फाउंडेशन आणि सह्याद्री ग्रामीण क्रिकेट असोसिएशन यांच्या माध्यमातून पंढरपूर येथे गेलेल्या वारकऱ्यांना टोल माफी व पाणी बॉटल वाटप

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,(केतन भोज) :** खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले तसेच महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि श्रीमंत छत्रपती संभाजी राजे यांच्या मार्गदर्शनाखाली व अमर दादा पाटील व सह्याद्री ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत भाऊ मोरे तसेच युवा कीर्तनकार हभप श्री.बाळकृष्ण महाराज आहिरे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली नवनाथ बाबा आहिरे फाऊंडेशन तसेच सह्याद्री ग्रामीण क्रिकेट असोसिएशन यांच्या माध्यमातून कार्तिकी वारी निमित्ताने तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे दर्शनासाठी जाण्या व येण्यासाठी टोल फ्री करून देण्यात आले होते.




तसेच सर्व वारकऱ्यांना पाणी बॉटल वाटप करण्यात आले.मुंबई मधील उद्योजक राम रिंगे,महासेना क्रांतिकारी संघटना भारत व प्रमोद केशव (महासेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख)आणि नवनाथ आहिरे फाऊंडेशनचे पदाधिकारी निशांत (बंटीभाऊ)पांगे,गिरीष भाऊ नार्वेकर,विक्की आहिरे यांच्या वतीने यंदाची कार्तिकी एकादशी वारी सुखरूप झाली.असे मत यावेळी आलेल्या वारकरी बांधवांनी व्यक्त केले.याशिवाय काही ठिकाणी अडचणी निर्माण झाल्या असतील परंतु आम्हाला आपल्या वारकरी संप्रदायाची सेवा करण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्य आहे ज्या काही अडचणी निर्माण झाल्या त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो पुढे असे होणार नाही याची काळजी घेऊन पुढील वर्षी आपली सेवा कशी अधिकाधिक योग्यप्रकारे सेवा करता येईल याची काळजी घेतली जाईल,असे ही यावेळी सेवेकरी नवनाथ बाबा आहिरे यांनी सांगितले.

# आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न

## आदिवासी समाजातील नेते, सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी-कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**

आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या जयंतीनिमित्त आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे नगर (कोळीवाडा), पिंपळगाव बसवंत येथे अभिवादन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात समाजातील विविध कार्यकर्त्यांनी हजर राहून या महान क्रांतिकारकास विनम्र अभिवादन अर्पण केले.

कार्यक्रमास आदिवासी उलगुलान सेना, आदिवासी शासन महाराष्ट्र राज्य, तसेच महात्मा रावण किंग फाउंडेशन या संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्तु भाऊ झनकर यांनी राघोजी भांगरे यांच्या कार्याचा आणि बलिदानाचा उल्लेख करत आदिवासी समाजाने एकतेच्या बळावर सामाजिक न्यायासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.



यावेळी सामाजिक कार्यकर्ते अनिल आण्णा मोरे, गणेश भाऊ शेवरे, शंकर शेवरे, माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष भाऊ गांगुर्डे, विलास शेवरे, आकाश गांगुर्डे, जयश कुऱ्हाडे, विशाल बागुल, भगवान बदादे, लक्ष्मण गांगुर्डे, भरत मोरे, तसेच निर्भय पार्टीचे तालुकाध्यक्ष संतोष सुरडकर, फारुख शेख, संतोष बोरसे, जालिंदर गायकवाड, प्रकाश गवारे, दत्ता पवार, सुनील गांगुर्डे, सचिन घुटे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी क्रांतिकारकांच्या कार्याचा गौरव करत, आजच्या तरुण पिढीने राघोजी भांगरे यांच्यासारख्या वीरांचा आदर्श ठेवावा, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक समाजबांधवांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. शेवटी उपस्थित सर्वांनी सामाजिक ऐक्य, आदिवासी सन्मान आणि शौर्याची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प केला.

## मृतावस्थेत अर्भक सापडल्याने खळबळ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर):**कळंबोली सेक्टर-१ परिसरात दोन दिवसांचे अर्भक मृतावस्थेत सापडल्याने या परिसरात खळबळ उडाली आहे. स्थानिक रहिवाशांना रस्त्यालगत एक अर्भक आढळून येताच त्यांनी तत्काळ कळंबोली पोलिसांना ही माहिती दिली. त्यावर पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत अर्भकाला उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले.प्राथमिक अंदाजानुसार, अर्भकाला जाणीवपूर्वक टाकून दिल्याची शक्यता वर्तवली जात आहे. लोकवस्तीत अर्भक आढळल्यानंतर परिसरात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, येथील रहिवाशांनी या कृत्याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास कळंबोली पोलीस ठाण्याचे पो. नि. अभयसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलीस सीसीटीव्ही फूटेज, स्थानिक माहितीदार यांच्यामार्फत करीत असल्याचे सांगण्यात आले आहे. या अर्भकाला कोणी व कोणत्या परिस्थितीत टाकून दिले याप्रकरणी पोलिसांकडून सखोल तपास केला जात असून, लवकरच या प्रकरणाचा उलगडा होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## ठाण्याच्या शिरपोचात कलाकार योगेश्वरीच्या कर्तृत्वामुळे आणखी एक मानाचा तुरा

**दैनिक युवक आधार**

**ठाणे(प्रसाद हनुमंते) :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुलुंड शाखेच्या वतीने आयोजित एकपात्री अभिनय स्पर्धेत ठाण्याची बालकलाकार योगेश्वरी बन हिने प्रथम क्रमांक पटकावला असून तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अवघ्या काही दिवसांपूर्वीच, ऑक्टोबर महिन्यात, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या बालनाट्य महोत्सव स्पर्धेत ठाण्याचीच आणखी एक बालकलाकार वज्रेश्वरी बन हिने उत्कृष्ट अभिनयाचा बहुमान



मिळवला होता. त्यानंतर आता योगेश्वरीने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या एकपात्री अभिनय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून ठाणे शहराचा मान आणखी उंचावला आहे.योगेश्वरीच्या या उत्तुंग यशाबद्दल ठाणेकरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

## सुरेश खरात यांची भाजपा कामोठे शहर मंडळ चिटणीस पदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : कामोठे येथील सुरेश खरात यांची भाजपा कामोठे शहर मंडळ चिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसे पत्र त्यांना भाजपा कामोठे शहर मंडळ अध्यक्ष विकास घरत यांनी दिले आहे.

सुरेश खरात यांची भाजप कामोठे शहर मंडळ चिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली असून आगामी काळात सर्वांना सोबत घेऊन पक्ष संघटन अधिक मजबूत करून निवडणुकांमध्ये पक्षाला मोठे यश मिळवून द्याल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी पंतप्रधान, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, मुख्यमंत्री, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली



भाजपचे ध्येय धोरणे या कार्यक्रमांची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी देण्यात आली. सुरेश खरात हे कामोठे विभागात सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. त्याच्या या कार्याची दाखल घेऊन त्यांची कामोठे शहर मंडळ चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## उदगीर नगर परिषद निवडनुक इच्छुक उमेदावार मुलाखती

### नगर परिषद वर राष्ट्रवादी च झेंडा फडकणार का अशी चर्चा चालु

### मा . आमदार संजय भाऊ बनसोडे यांचे नगर परिषदेवर बारकाईने लक्ष

**दैनिक युवक आधार**

**उदगीर वार्ताहर:** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीसाठी 2 डिसेंबर 2025 रोजी मतदान होणार असल्याने उदगीर नगर परिषद मध्ये एकुण विस वार्ड आहेत राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या (अजित पवार) गट यांच्या वतीने इच्छुकांच्या मुलाखती रघुकुल मंगल कार्यालयात घेण्यात आले.

यावेळी मा . माजी मंत्री तथा उदगीर / जळकोट मतदार संघाचे आ. बनसोडे भाऊ बनसोडे हजर होते निवडणुकीत आपल्या प्रभागात विकास करणारा नगरसेवक आपण निवडून देणार असून यासाठी पक्षश्रेष्ठीने दिलेल्या उमेदवाराचे काम करुन आधिक आधिक मताने निवडून आणा



असे सर्व कार्यकते याना आवाहन केले.यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस ॲाडव्हकेट व्यंकट बेद्रे, सुरेखा पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरतभाऊ चामले, प्रदेश सरचिटणीस समीरभाई शेख, उदगीर तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष जानीमिया, वैशाली औटे आदी उपस्थित होते. इच्छुक उमेदवारा यांना योग मार्गदर्शन करून उदगीर नगर परिषद वर आपला झेडा फडकावणार . जनतेची कामे करणा-या कार्यकर्त्यांना न्याय देणार व उदगीर शहर स्मार्ट सिटी प्रमाणे करणार असल्याचे यावेळी माजी मंत्री मा . आ. संजय भाऊ बनसोडे म्हणाले .

## मुखेड येथे क्लास वरून घरी परतणाऱ्या 6 वर्षाच्या चिमुकलीवर 22 वर्षाच्या नरधामाकडून बलात्कार

### शहरात संतापाची लाट.आरोपीला फाशी देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :प्रशांत ढवळे**

नांदेड जिल्ह्यातील मुखेड शहरातुन एक धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. माणुसकीला काळिमा फसणाऱ्या या घटनेत एका सहा वर्षाच्या चिमुकलीवर एका बावीस वर्षीय नराधम तरुणाने अत्याचार केला आहे. या संतापजनक प्रकारे संपूर्ण परिसरात संतापाची लाट पसरली असून नागरिकांनी आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी दररोज प्रमाणे खाजगी शिकवणी ला गेली होती शिकवणी संम्पल्यानंतर ती घरी परतत असताना आरोपी ओमकार डाकुरवार (वय २२) या तरुणाने तिचा पाठलाग करुन तिच्यावर अत्याचार केला या भयंकर कृत्यानंतर आरोपी घटना स्थळावरून फरार झाला होता. मात्र पोलिसांनी तत्परतेणे कारवाई करत त्याला अटक केली.

या प्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध बाललैगीक अत्याचार प्रतिबंध कायदा (pocso act)तसेच इतर सबंधित कलमाखाली गुन्हा दाखलकरण्यात आला आहे. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याचे समजते. दरम्यान पीडित मुलीवर नांदेड येथील



शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असून तिची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.घटनेची माहिती समोर येताच मुखेड शहरात मोठया प्रमाणात नागरिकांनी संताप व्यक्त केला. शेकडो नागरिक मुखेड पोलीस ठाण्यासमोर जमले आणि आरोपीला तात्काळ फाशी द्यावी अशी मागणी केली. काही काळ परिसरात तणाव पूर्ण वातावरण होते. पोलिसांनी नागरिकांना शांत करण्याचा प्रयत्न केला आणि प्रकरणाचा तपास जलदगतीने सुरु असल्याचे सांगितले.या प्रकरणामुळे संपूर्ण नांदेड जिल्हा हादरला आहे. अशा नरधामांना कठोरात कठोरशिक्षा होऊन समाजात भीती निर्माण करावी अशी मागणी नागरिकांन कडून जोर धरत आहे.ही घटना केवळ एका कुटुंबाची न्हवे तर संपूर्ण समाजाची वेदना आहे. लहान मुली वरील अत्याचारांच्या वाढत्या घटनांनी पुन्हा एकदा सुरक्षा आणि न्याय याबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. समाजाने एकजूट होऊन अशा प्रवृतीविरुद्ध आवाज उठवणे आणि कायद्याने कठोर कारवाई व्हावी, हीच सर्वांची अपेक्षा आहे.

## मुंबई जिल्हा तायक्वोंदो कॅडेट आणि सिनिअर चॅम्पियनशिप स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज)**

मुंबईतील गुरुनानक खालसा कॉलेज, माटुंगा मुंबई येथे दिनांक 9 नोव्हेंबर 2025 रोजी 14 वी क्योरुगी आणि 6 वी पूम्से मुंबई जिल्हा तायक्वोंदो चॅम्पियनशिप 2025-26 उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ही स्पर्धा तायक्वांडो असोसिएशन, मुंबई या जिल्ह्याच्या अधिकृत संघटनेतर्फे भव्य प्रमाणात आयोजित करण्यात आली होती. या चॅम्पियनशिपमध्ये कॅडेट व सिनिअर या दोन वयोगटांत क्योरुगी आणि पूम्से अशा दोन




प्रमुख गटांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. संपूर्ण स्पर्धा मुंबई जिल्हा तायक्वोंदो संघटनेच्या समितीच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. स्पर्धेचे रेफरी इन्चार्ज निशांत शिंदे यांनी संपूर्ण स्पर्धेचे संचालन पार पाडले. यावेळी संघटनाचे सचिव विजय कांबळे तसेच जयेश वेल्हाळ, संतोष वाळुंज, राजेश मुरव आणि ओमकार पाटील यांनी मुंबई जिल्ह्याच्या अधिकृत संघाची घोषणा केली.**राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मुंबई जिल्हा सज्ज**

मुंबई जिल्ह्याचा निवड झालेला संघ 13 ते 14 नोव्हेंबर 2025 रोजी साई सिल्व्हर लान्स, शिर्डी (जि. अहमदनगर) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कॅडेट तायक्वोंदो स्पर्धेत सहभाग नोंदवणार आहे. संघ व्यवस्थापक: प्रिती देब, पूम्से प्रशिक्षक: यश दळवी, पूम्से टीम मॅनेजर: प्रिती देब हे सर्वजण मुंबई जिल्ह्याचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्य पार पाडणार आहेत. या चॅम्पियनशिपमध्ये पूम्से इव्हेंटमध्ये सिद्धकला तायक्वोंदो अकॅडमीने प्रथम क्रमांक पटकावला.

## दौलवडगाव येथील फसलेवस्ती जवळ रस्त्यावर मोठमोठे खड्डे नागरिक त्रस्त!; अहिल्यानगर बीड रस्त्यावरील अवस्था

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे**

दौलवडगाव येथील फसलेवस्ती जवळ नगर–बीड मुख्य हायवेवर सध्या मोठमोठे खड्डे पडले असून, या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

दिवसभर या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. मात्र, रस्त्याची दुर्दशा झाल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, अनेक वेळा संबंधित विभागाचे लक्ष वेधूनही



अद्याप कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या संदर्भात ॲड. संभाजी दहातोंडे यांनी सांगितले की, "जर सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेतली नाही, तर आम्ही या रोडवरील खड्ड्यांमध्ये झाडे लावून आंदोलन करू."

नागरिकांच्या या संतापानंतर आता सार्वजनिक बांधकाम विभाग काय भूमिका घेतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.स्थानिक नागरिकांकडून रस्त्याच्या अवस्थेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

## सेवानिवृत्त दाम्पत्याला घातला लाखोंचा गंडा; खारघरमध्ये सायबर चोरट्यांचा डिजिटल ॲरेस्टचा भयानक फास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात अडकवून खारघर येथे राहणाऱ्या एका सेवानिवृत्त दाम्पत्याची तब्बल ४४ लाख ९१ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या सायबर टोळीने चक्क आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांचे नाव आणि ईडीसारख्या सरकारी यंत्रणांचा वापर करून वृद्ध जोडप्याला भीती दाखवून त्यांना ऑनलाइन पद्धतीने ही रक्कम पाठवण्यास भाग पाडल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर टोळीविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. फसवणूक झालेले ७८ वर्षीय ज्येष्ठ नागरिक खारघरमध्ये राहतात. गेल्या १५ ऑक्टोबर रोजी सायबर टोळीतील एकाने त्यांना संपर्क करून तो डेटा प्रोटेक्शन बोर्डातून शर्मा बोलत असल्याचे सांगितले. तसेच नाशिकमधील काही लोकांकडून पैसे उकळल्याच्या तक्रारी त्यांच्याविरोधात मिळाल्याचे त्यांना सांगितले. याप्रकरणी नाशिक शहरातील रॉडरीक्स नावाच्या एका व्यक्तीने त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केल्याचे सांगितले. तर या सायबर टोळीतील दुसऱ्या आरोपीने पोलीस अधिकारी हेमराज कोहली असल्याचे भासवून या ज्येष्ठ नागरिकाला तपासामध्ये सहकार्य करण्यास सांगितले. सहकार्य न केल्यास एका तासाच्या आत त्यांना अटक करण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांनी या वयोवृद्ध दाम्पत्याला मोठ्या शिक्षेची भीती दाखवून विश्वासात घेतले. तसेच त्यांनी सहकार्य केले नाही, तर त्यांना ७ वर्षांची शिक्षा किंवा जन्मभर तुरुंगवास होईल, अन्यथा ५ कोटींचा दंड भरावा लागेल, अशी भीती दाखवली. त्यानुसार या ज्येष्ठ नागरिकाने व त्यांच्या पत्नीने सायबर गुन्हेगारांनी सांगितल्याप्रमाणे सारस्वत बँक आणि शामराव विठ्ठल को-ऑप. बँक खात्यातून आरटीजीएसद्वारे एकूण ४४ लाख ९१ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने आरोपींच्या खात्यांवर पाठवले. मात्र, या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्वरित खारघर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर गुन्हेगारांविरोधात गुन्हा नोंद करून तपासाला सुरुवात केल्याचे सांगितले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# करंजाडे पाणी समस्या निवारण सुरुवात लोकनियुक्त सरपंच मंगेश तानाजी शेलार यांन मार्फत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी रुपेश राजे**

सिडको अधिकारी श्री. वीरेन्द्र पाटील साहेब आणि मा. मंगेश दादा शेलार (लोकनियुक्त सरपंच करंजाडे)व उपसरपंच सागर भाई आंग्रे आणि ग्रामपंचायत सदस्य सुनील भोईर,अजित साबळे यांच्या नेतृत्वाखाली हिलसाईट सेक्टरमधील पाणी समस्येची पाहणी झाली आणि निवारणासाठी तातडीने कामे हाती घेण्यात आली आहेत.



**मुख्य कामे:**

वॉटर फ्लशिंग: पाईपलाईनमधील अडथळे दूर करण्यासाठी फ्लशिंग केले जाणार.

क्षमता वाढ: सध्याची १०० मिमी पाईपलाईन बदलून ती २०० मिमी क्षमतेची केली जात आहे.

नवीन सुविधा: यामध्ये २४ तास पाणीपुरवठा लाईन आणि ३ नवीन वाल्व्ह जोडले जातील.

संपूर्ण सेक्टरसाठी योजना: इतर बिल्डिंगमधील १०० मिमी लाईनही २०० मिमी क्षमतेच्या करण्यात येणार आहेत.

या संयुक्त प्रयत्नांमुळे पाण्याचा प्रश्न लवकरच कायमस्वरूपी सुटणार आहे.सिडको अधिकारी आणि सरपंच महोदयांच्या या संयुक्त प्रयत्नांमुळे, येत्या काही दिवसांतच पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सोडवला जाईल, अशी ग्वाही देण्यात आली असून काम सुरू झाले आहे.या महत्त्वपूर्ण कामासाठी मा. वीरेन्द्र पाटील साहेब आणि लोकनियुक्त सरपंच मा. मंगेश दादा शेलार यांचे विशेष आभार.

# यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील शेतकरी हादरले!

## "निवडणुकीमुळे आता भाव वाढणार नाही, जगावे की जीव द्यावे ?

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी महेश पेन्दोर**

**घाटंजी** : सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या धामधुमीत, यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील शेतकरी बांधवांमध्ये एक हादरवून टाकणारी आणि अत्यंत गंभीर चर्चा जोर धरू लागली आहे. "निवडणूक आचारसंहितेमुळे आता भाव वाढणार नाही आणि कर्जमाफीही मिळणार नाही," या भीतीने शेतकरी पुरते हताश झाले आहेत.



अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असतानाही कापसाला योग्य भाव मिळत नाही, त्यातच निवडणुकीच्या काळात सरकारचे दुर्लक्ष होण्याची भीती शेतकऱ्यांच्या मनात घर करून बसली आहे.

"गरजेच्या वेळी झुलवतात, निवडणुकीत मतं घेतात!"

शेतकऱ्यांच्या या चर्चेतून तीव्र संताप आणि वेदना व्यक्त होत आहेत:

'गरजेच्या वेळी झुलवतात': "शेतकऱ्याच्या मालाला जेव्हा नैसर्गिक आपत्तीमुळे अफाट नुकसानीचा सामना करावा लागतो तेव्हा आम्हाला भावाची नितांत गरज असते, पण सरकार आम्हाला फक्त झुलवत ठेवते."

'खर्चाचं काय करायचं?': "आमचे संपूर्ण घर या मालावर चालते. मालाला भावच मिळणार नसेल, तर आम्ही आमचा खर्च कसा काढायचा? जगायचे कसे?"

'कर्जमाफीचं आश्वासन हवेत!': कर्जमाफीचे आश्वासन देऊन ठेवले जाते, पण प्रत्यक्षात सर्व संपून गेल्यावर त्याचा काय उपयोग?

'कटपुतळी बनलेल्या आहोत': "सरकार शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ खेळते. आम्ही शेतकरी या सरकारची फक्त कटपुतळी बनून राहिलो आहोत. आम्हाला कधीच न्याय मिळत नाही."

जगावे की मरावे ?' - आत्महत्येचा विचार!

सध्याच्या भीषण परिस्थितीत "शेतकरी जगावे की मरावे ?" असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. कर्जाच्या खाईत ढकलणारे सरकारच आहे, असा थेट आरोप शेतकरी करत आहेत. त्यांच्यासाठी आता आत्महत्या हा एकमेव पर्याय उरला आहे की काय, अशी भीतीदायक चर्चा सुरू आहे.

पाऊस जास्त असल्याने कापसाचे पीकही व्यवस्थित झालेले नाही, त्यात भाव मिळत नसल्याने घाटंजी तालुक्यातील शेतकरी पूर्णपणे आर्थिक संकटात सापडले आहेत.

सध्याची परिस्थिती: अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान, कापसाला कवडीमोल भाव , निवडणूक आचारसंहिता भाववाढ/कर्जमाफीची शक्यता मावळली शेतकरी पूर्णतः हवालदिल.

शेतकऱ्यांचा सवाल: "निवडणुका महत्त्वाच्या की शेतकऱ्यांचे जीवन?" संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांचा हा संघर्ष पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# आई डे केअर संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा टेबल टेनिसमध्ये ऐतिहासिक विजय!

**दैनिक युवक आधार**

**पेण (दीपक लोके) :** आई डे केअर संस्था संचालित बौद्धिक अक्षम (मतिमंद ) मुलांसाठी निवासी व्यवसाय शिक्षण-प्रशिक्षण केंद्र, रामवाडी पेण येथे शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी 16th महाराष्ट्र स्टेट टेबल टेनिस टुर्नामेंट, गोरेगाव येथे दणदणीत कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील 7 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि सर्वांनीच गोल्ड मेडल जिंकून संस्थेचा झेंडा उंचावला.



**12 ते 15 वर्ष वयोगटात :**

भावार्थ म्हात्रे — गोल्ड मेडल

**16 ते 21 वर्ष वयोगटात :**

तन्मय मोकल — गोल्ड मेडल

धनंजय चंदने — गोल्ड मेडल

यज्ञेश पाटील — गोल्ड मेडल

**21 वर्षापुढील वयोगटात :**

सुयोग पाटील — गोल्ड मेडल

प्रणव टिबे — गोल्ड मेडल

आदित्य रामकृष्णन — गोल्ड मेडल

ही सर्व विद्यार्थ्यांची कामगिरी अधिक कौतुकास्पद ठरते कारण एकूण सातही विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सर्वांनी सुवर्णपदक जिंकले!या यशामागे शाळेचे क्रीडा प्रशिक्षक व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक श्री. सिद्धांत म्हात्रे सर यांचे मार्गदर्शन तसेच संस्थेचे



विश्वस्त यांचे सातत्यपूर्ण सहकार्य मोलाचे ठरले आहे.आई डे केअर संस्था परिवारातर्फे सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

# दिव्यांग विभागात विना नोंदणी काम करणाऱ्या संस्थानवर कारवाई होणार

## श्री.बाळासाहेब सोळंकी- प्रादेशिक उपायुक्त, दिव्यांग कल्याण विभाग मुंबई

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले** : मुंबई विभागात दिव्यांग क्षेत्रात अनेक संस्था विना नोंदणी कार्य करीत असल्याचे शासनाच्या निदर्शनास येत आहे. त्यामुळे मुंबई विभागातील मुंबई शहर,मुंबई उपनगर, पालघर, रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयातील ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्य करत आहेत. त्योना कायद्यानुसार नोदणी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे संबंधीत संस्थानी दिनांक 30 नोव्हेंबर पर्यंत नोंदणी करुन घ्यावी अन्यथा अशा संस्थांवर कारवाई करण्यात येईल अशा इशारा श्री. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, दिव्यांग कल्याण विभाग, मुंबई यांनी दिला आहे.दिव्यांग विभागाचे सचिव मा.श्री.तुकाराम मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणाली व्दारे राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची दिनांक 7/11/2025 रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत मा.सचिव यांनी दिलेल्या निर्देशानुसार दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी संस्थाना नोंदणी करणे अनिवार्य आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 नुसार दिव्यांग कल्याण आयुक्त यांना सक्षम अधिकारी घोषित करण्यात आले असुन यांच्यामार्फत नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी दिव्यांग हक्क अधिनियम 2016 मधील कलम 51 व 52 नुसार संस्थेची नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्यानुसार मुंबई विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर ,पालघर, रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयातील ज्या संस्थाना दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाचे आहे अशा संस्थानी 30.11.2025 पर्यंत नोंदणी करुन घेणे बंधनकारक आहे. संस्थेच्या नोंदणीचा प्रस्ताव संबंधित जिल्हयाच्या दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाकडे सादर करावा. अन्यथा दिव्यांग हक्क अधिनियम 2016 मधील कलम 91 नुसार विना नोंदणी कार्यरत संस्थेवर कारवाई करण्यात येणार आहे. असेही यावेळी श्री. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, दिव्यांग कल्याण विभाग, मुंबई यांनी सांगितले.

# मॉ तुळजाई पेट्रोलियम पंपावर मुलभूत सुविधांचा अभाव : पेट्रोल पंप चालकांविरोधात ग्राहक पंचायतीची कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**

**किनवट :** किनवट - माहूर महामार्गावरील घोटी(ता.किनवट) येथील मॉ तुळजाई पेट्रोलियम पंपावर मुलभूत सुविधांचा अभाव आहे.या पेट्रोल पंप चालकांविरोधात प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी मागणी किनवट तालुका ग्राहक पंचायतीने केली आहे.

घोटी परिसरात कार्यरत असलेल्या या पेट्रोल पंपांवर ग्राहकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत मुलभूत सुविधांचा अभाव असलेल्या या पेट्रोल पंप चालकांविरोधात कारवाई करावी , अशी मागणी किनवट तालुका ग्राहक पंचायत या संघटनेचे अध्यक्ष ॲड.मिलिंद सर्पे यांनी केली आहे.




पिण्याचे पाणी, स्वच्छ शौचालय, बसण्यासाठी जागा, महिलांसाठी स्वतंत्र सुविधा, अग्निशामक यंत्रणा, तसेच प्राथमिक उपचार पेटी यांसारख्या सुविधा या ठिकाणी नाहीत. परिणामी वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

वाहनधारकांना इंधन भरण्यासाठी थांबावे लागते, मात्र या वेळेत पाणी प्यायचे असो किंवा शौचालय वापरायचे असो या ठिकाणी त्या सुविधा उपलब्ध नाहीत. या पंपांवर स्वच्छतेचा अभाव असल्याने तेथे दूषित वातावरण निर्माण झाले आहे.पेट्रोल भरल्यावर ग्राहकांना मागणी करूनही पावती दिली जात नाही. येथे हवा भरण्याची व्यवस्था नाही. फक्त दिखाव्यासाठी हवा भरण्याचे मशिन लावून ठेवले आहे. हवा भरण्याची मागणी केल्यावर हवा भरणार कामगार गावात जेवायला गेला आहे,असे सांगण्यात येते. भरलेले पेट्रोल कमी आलेले आहे व भरलेल्या पेट्रोल मध्ये भेसळ आहे,अशी शंका ग्राहकाने उपस्थित केल्यावरही त्या तपासणी करून दाखवण्यात येत नाही. तसेच तक्रार पुस्तिकेची मागणी केल्यावरही तक्रार पुस्तिका ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येत नाही.ती घरी ठेवलेली आहे,असे सांगण्यात येते.

“पेट्रोल पंप परवाना घेताना या सर्व सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक असते. तरीसुद्धा या ठिकाणी या नियमांचे उल्लंघन होत आहे.”ग्राहक कल्याणासाठी केंद्र सरकार आणि तेल कंपन्यांनी स्पष्ट नियम केलेले असून प्रत्येक पंपावर मुलभूत सुविधा असणे अनिवार्य आहे. तरीदेखील प्रत्यक्षात या नियमांचे पालन होत नसल्याचे वास्तव उघड झाले आहे.

त्यामुळे संबंधित तेल कंपन्या व स्थानिक प्रशासनाने निष्काळजी पंपधारकांविरुद्ध कारवाई करावी, तसेच सर्व पंपांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी किनवट तालुका ग्राहक पंचायतीने केली आहे. यामुळे प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयींना आळा बसेल, असा जनतेचा विश्वास आहे.

# प्राचीन वारसा असलेले स्थळ श्री नागनाथ भगवान मंदिर क्षेत्र हातनूर येथे जिल्हाधिकारी यांची भेट

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

सेलू तालुक्यातील हातनुर येथे परभणी जिल्हाचे जिल्हाधिकारी आदरणीय श्री संजयसिंह चव्हाण साहेब, सेलू तहसिल चे तहसिलदार आदरणीय श्री डॉ शिवाजीराव मगर साहेब ,सेलू पंचायत समिती चे B D O आदरणीय श्री उदय जाधव साहेब, सेलू तहसिल चे श्री टाक साहेब यांनी श्री नागनाथ भगवान मंदिराला भेट दिली मंदिर परिसर व बारवतिर्थ ची पाहणी केली.

या वेळी मंदिर समिती चे अध्यक्ष श्री बालासाहेब आंधळे, मंदिर समिती चे सदस्य




श्री आसारामजी काकडे, श्री दत्तराव आंधळे श्री अंकुश राव शेळके सरपंच श्री महेद्र गाडे, श्री बालासाहेब शेळके श्री अनंता जोशी महाराज श्री विष्णू सज्जन ,श्री परमेश्वर आंधळे श्री मुन्ना आंधळे, पोलीस पाटील श्री रामचंद्र पारवे व गावातील नागरिक उपस्थित होते या वेळी मा. जिल्हाधिकारी साहेब, मा तहसिलदार साहेब यांचा मंदिर समिती च्या वतीने सत्कार करण्यात आला ,आदरणीय जिल्हाधिकारी साहेब यांनी मंदिर परिसराची व बारवतिर्थ ची पाहणी करून गावकऱ्यांनी ऐतिहासिक वारसा चांगल्या प्रकारे जतन केला म्हणून गावकऱ्यांचे कौतुक केले.

# काळ्या काचांच्या गाड्यांवर रायगड पोलिसांची धडक मोहीम; बड्यांच्या काळ्या काचांवरही कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पेण- दीपक लोके**

काळ्या काचांमुळे होणारे अनेक प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी सर्व तालुक्यांतील गाड्यांच्या काचांना लावण्यात आलेल्या काळ्या कलरच्या फिल्म काढण्याची व दंडात्मक कारवाई करण्याची धडक मोहीम नोव्हेंबर पासून हाती घेतली आहे. मात्र, सर्वसामान्य कारचालकांवर बिनदिक्कत कारवाई करणाऱ्या पोलिसांनी ‘बड्यांकडे’ दुर्लक्ष न करता त्यांच्यावरही कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य चालकांकडून होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट 2012 मध्ये काळ्या काचा असणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यावेळचे गृहमंत्री यांनीही पोलिस व परिवहन अधिकाऱ्यांना या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची सूचना केली होती. आताही कोणत्याही दबावाला न जुमानता काळ्या काचांच्या गाड्यांवर जास्तीत जास्त कारवाई करण्याचे आदेश रायगडच्या डॅशिंग पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी दिले आहेत. मोटार वाहन कायद्याच्या कलम 100 (2) / 117 नुसार काळ्या काचा असणाऱ्या प्रत्येक वाहनावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. मात्र, केवळ काही रुपये दंड आकारण्याची तरतूद असल्याने त्यामुळे वाहनधारकांना कारवाईची भीती नसून ते दंड भरून निघून जात आहेत. शासनाने याकडे लक्ष देऊन दंड व शिक्षाच्या तरतूद मध्ये बदल करावा. तसेच रायगड पोलिसांनी सदर गाडी पकडल्यानंतर त्या काळ्या काचेची संपूर्ण फिल्म अगर इतर पर्याय फाडून काढून टाकावे अशी मागणी सर्वसामान्यांतून जोर धरत आहे.

**राजकीय नेत्यांकडे कानाडोळा नकोच**

नियमानुसार मुख्यमंत्री, कॅबिनेट दर्जाचे मंत्री, राज्यमंत्री, झेड आणि वाय सिक्युरिटी असलेल्या व्यक्तींच्या वाहनांवर काळ्या काचा लावण्याची परवानगी आहे. मात्र खासदार, आमदार, महापौर, नगरसेवक व शासकीय अधिकाऱ्यांना अशी परवानगी नाही. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, पोलिस आयुक्त, पोलिस व शासकीय वाहनांच्या काचेवर काळी फिल्म लावायची असल्यास न्यायालयाच्या सूचनेनुसार स्थापन करण्यात आलेल्या विशेष समितीची परवानगी घ्यावी लागते. परंतु या समितीकडून परवानगी न घेता सर्रास काचांवर फिल्म



चढवल्या जात आहेत. विशेष म्हणजे राजकीय व्यक्ती किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाईच होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. त्यामुळे या बड्या धेंडाकडे कारवाई दरम्यान कानाडोळा नको अशीही मागणी जोर धरत आहे.

**रस्त्यावर चार प्रकारच्या फिल्म**

खाजगी कार, स्कूल बस, कंपनीच्या कार , कंपनीच्या बसेस, खासगी वाहने, काळी-पिवळी, शासकीय वाहने, पोलिसांच्या गाड्या अशा सर्वच वाहनांच्या काचांवर काळी फिल्म चढवण्यात आली आहे. जिल्ह्यात चार प्रकारच्या फिल्म उपलब्ध आहेत. त्यात प्रामुख्याने 50 आणि 70 टक्के अल्ट्राव्हॉयोलेट रेंजपासून सुरक्षा करणाऱ्या या फिल्म आहेत. फिकट आणि गडद अशा विविध प्रकारात या फिल्म मोडतात. फिल्म लावण्यासाठी 5 ते 25 हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. मोठ्या रेडियम सेंटरमध्ये व काचांच्या दुकानांमध्ये गाड्यांना फिल्म लावून मिळतात त्यांना सुद्धा नियम पाळण्याचे आदेश दिले पाहिजेत.

**काळ्या काचांच्या गाड्यांमधून 'रेकी'**

अनेक गुन्हेगार गुन्हा करताना काळ्या काचांची गाडी वापरताना निदर्शनास आले आहे. काळ्या काचांच्या गाडीमध्ये तासनतास बसून बंद असलेले बंगळे, बिल्डिंग, कुलूप असलेला घरांची रेकी करण्यास वापर केला जात आहे. सदर गाडीच्या काचा काळ्या असल्याने बाजूने जाणाऱ्या नागरिकांचे लक्ष लागत नाही.

**नोव्हेंबर पासून कारवाईला सुरुवात**

दरम्यान रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी ऑक्टोबर महिन्यात गुन्हेगारी मुक्त गाव, आपली जबाबदारी आपला अभिमान या ऑनलाईन मार्गदर्शन सत्रात उपस्थित केलेल्या काळ्या काचांच्या गाड्यांवरील प्रश्नाला उत्तर देताना, येत्या नोव्हेंबर महिन्यापासून धडक कारवाई करण्यात येणार असल्याचे एसपी दलाल यांनी सांगितले.

# पनवेल महापालिकेची २२४ झाडांवर कुऱ्हाड?

## नागरी घनकचरा व्यवस्थापन विस्तारात अडसर



**पनवेल** : पनवेल महानगरपालिका हरित पनवेलचे उद्दिष्ट गाठण्यासाठी यंदाच्या वर्षात सव्वा लाख वृक्ष लागवड करणार आहे. परंतु दूसरीकडे सिडकोच्या संयुक्त विद्यमाने तळोजा येथील घोटचाळ गावाशेजारी सुरू असलेल्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारामध्ये अडचण ठरणारी ७ ते १० वर्षे वयाची २२४ झाडांची तोड करण्याचा प्रस्ताव पुढे आल्यामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

या वृक्षतोडीबद्दल नागरिकांना माहिती मिळावी यासाठी महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या हरकती मागविण्याची जाहीर नोटीस बुधवारी प्रसिद्ध केली आहे.

या झाडांमध्ये सुबाभूळ, जांभूळ, करंज, काजू, साग, निम, कदंब, सोनमोहर, आंबा, गुलमोहर, बहावा यांसारख्या विविध प्रजातींचा समावेश आहे.

ही झाडे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भूखंडाभोवती परिधीय मार्ग आणि जलनिस्सारणासाठी करावयाच्या बांधकामासाठी अडथळा ठरत आहेत.

विशेष म्हणजे, यापूर्वी जुलै महिन्यात कळंबोली सर्कलच्या विस्तारासाठी १० ते ६० वर्षे वयाच्या ६९० झाडांचे पुनर्रोपण करण्याचा प्रस्ताव आला होता.

त्यावेळी नागरिकांच्या हरकती मागवल्या असूनही एकही हरकत महापालिकेकडे आली नव्हती.

सध्या या पुनर्रोपणासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने (एमएसआयडीसी) प्रतिझाड १ हजार रुपयांप्रमाणे अनामत रक्कम भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

नागरिकांनी या झाडांच्या तोडणीसंबंधी हरकती किंवा सूचना १२ नोव्हेंबरपर्यंत लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन महापालिकेच्या उद्यान विभाग आणि वृक्ष प्राधिकरणाने केले आहे.

मुदतीत हरकती न आल्यास वृक्ष प्राधिकरण झाडतोडीस सशर्त परवानगी देण्याची कार्यवाही करणार असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.

# 11 नोव्हेंबरपासून डॉक्टरांचा आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर, केतन भोज**

मुंबईतील रुग्णालये आणि खाजगी दवाखान्यांमधून निर्माण होणारा जैवरासायनिक कचरा संकलनाचे काम राज्य शासनाने एस एम एस इंव्होक्लीन प्रा.लि. या कंपनीकडे दिलेले आहे. मात्र या कंपनीकडून डॉक्टरांकडून शासन-निर्धारित दरांपेक्षा जास्त शुल्क आकारणी, निकृष्ट सेवा आणि कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन होत असल्याचा गंभीर आरोप नॅशनल इंटिग्रेटेड डॉक्टर्स असोसिएशन तर्फे करण्यात आला आहे. या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सविस्तर निवेदन देण्यात आले असून 11 नोव्हेंबर 2025 पासून मंत्रालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.शासनाने निश्चित केलेले जैवरासायनिक कचरा संकलनाचे दर न पाळता कंपनीकडून डॉक्टरांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी केली जात असल्याचा आरोप डॉक्टरांकडून केला जात आहे. कंपनीकडून कचरा उचलण्यात अनियमितता दाखवली जात असून काही दवाखान्यांत कचरा अनेक दिवस पडून राहतो असे असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ योगेश भालेराव यांनी सांगितले. तर कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून डॉक्टरांना धमकावणे,उद्धट वर्तन आणि सेटलमेंटच्या नावाखाली




लाच मागण्याचे प्रकार घडत असल्याचे असोसिएशन ने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. कंपनीकडे बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनाकडून मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर होत असल्याचा आरोप डॉक्टरांमध्ये वाढत आहे. अतिरिक्त व गैरकायदेशीर शुल्क परत न केल्यास मोठा भ्रष्टाचार उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहेकंपनीचे संचालक सौरभ शर्मा यांनी चर्चेत सुधारणा करण्याचे आश्वासन दिले असले तरी ते आजतागायत अमलात आणले गेलेले नाही.

**डॉक्टर संघटनेच्या पाच ठोस मागण्या**

एस एम एस इन्व्होक्लीन प्रा . लि.कंपनीच्या कामकाजाची सखोल चौकशी झाली पाहिजे, डॉक्टरांकडून केलेली अवाजवी शुल्क आकारणी तात्काळ परत करावी , मुंबईसाठी नवीन, पारदर्शक व उत्तरदायी जैवरासायनिक कचरा व्यवस्थापन प्रणाली सुरू करण्यात यावी, सदर कंपनीला दिलेले कंत्राट रद्द करणे आणि नवीन निविदा प्रक्रिया (टेंडर) लागू करावे

**प्रतिक्रिया**

डॉ अमोल आंबेकर ( अध्यक्ष , नॅशनल इंटिग्रेटेड डॉक्टर्स असोसिएशन ) : डॉक्टर वर्गाची अनेक वर्षे फसवणूक होत आहे. जर त्वरित कार्यवाही झाली नाही, तर 11 नोव्हेंबर 2025 रोजी मंत्रालयासमोर आमरण उपोषण करू

# लातूरमध्ये अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यास अटक; वारद मेडिकलवर गुन्हा दाखल!

**दैनिक युवक आधार**
**लातूर: वार्ताहर**

लातूर शहर पोलिसांनी जुन्या रेल्वे स्टेशन परिसरातील मोकळ्या पार्किंगमध्ये एका व्यक्तीला कारमध्ये अंमली पदार्थांचे सेवन करताना रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईत अंमली पदार्थांची अवैध विक्री करणाऱ्या शहरातील एका मेडिकल दुकान मालकावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गुप्त माहितीवर कारवाई**

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, जुने रेल्वे स्टेशन परिसरातील मोकळ्या पार्किंगमध्ये एका व्यक्तीने कारमध्ये अंमली पदार्थांचे सेवन करत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पंचसमक्ष संशयित व्यक्तीची झडती घेतली.

**जप्त करण्यात आलेला अवैध माल**

संबंधित व्यक्तीच्या झडतीत खालील आक्षेपार्ह वस्तू आढळून आल्या आणि पोलिसांनी त्या जप्त केल्या:

टैपेन्टॅडॉल (Tapentadol) घटक असलेल्या शेड्यूल H1 गुंगीकारक गोळ्यांची 10 गोळ्यांची स्ट्रिप. (या गोळ्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विकण्यास बंदी आहे)

इंजेक्शन सिरींज.

एका कापडी पिशवीत वायग्रा गोळ्यांची स्ट्रिप.

एक प्रेसिंग बॉल.

तीन लाइटर.

नशा करण्यासाठी हाताला बांधण्यासाठी वापरले जाणारे एक काळा आणि एक लाल बेल्ट.

दोन काचेच्या चंबू आकाराच्या नळ्या (चिल्लम).

रक्ताचे डाग लागलेले कपड्याचे तुकडे.

टैपेन्टॅडॉल (Tapentadol) घटक असलेल्या शेड्यूल H1 गुंगीकारक गोळ्यांची रिकामी स्ट्रिप.

एक स्टीलचा ग्लास.

एक इंजेक्शनची न वापरलेली सुई.

**मेडिकल दुकानाविरुद्ध गुन्हा दाखल**

पोलिसांनी संबंधित व्यक्तीकडे गुंगीकारक औषधांच्या प्रिस्क्रिप्शनबाबत चौकशी केली असता, त्याने प्रिस्क्रिप्शन नसल्याचे सांगितले. धक्कादायक बाब म्हणजे, तो गेल्या तीन महिन्यांपासून गांधी चौकातील वारद मेडिकलमधून ही गुंगीकारक औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय खरेदी करत असल्याचे त्याने कबूल केले.

या कबुलीच्या आधारावर, पोलीस हवालदार महेश पारडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गांधी चौक, लातूर येथील वारद मेडिकलच्या मालकाविरुद्ध गांधी चौक पोलीस स्टेशन, लातूर येथे गुरनं. ५१६/२०२५, कलम १२३ बीएनएस (BNS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अवैध विक्री करणाऱ्यांवर विशेष मोहीम**

लातूर शहरात प्रिस्क्रिप्शनशिवाय गुंगीकारक औषधांची अवैध विक्री करणाऱ्या मेडिकल दुकानांवर कडक कारवाई करण्यासाठी एक विशेष मोहीम हाती घेण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. यामुळे शहरात अवैध नशाखोरी करणाऱ्यांवर आणि त्यांना औषधे पुरवणाऱ्यांवर कायद्याचा चाप बसणार आहे.

**या कारवाईत सहभागी झालेले अधिकारी :** ही महत्त्वपूर्ण कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर आणि श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांनी त्यांच्या कार्यालयातील पोलीस अंमलदार महेश पारडे, अरविंद वाघमोडे, गणेश मोरे, राहुल क्षीरसागर आणि रविसन जाधव यांच्या सहकार्याने यशस्वी केली.

# कोकणातील नमन कलेचा मुंबईत शुभारंभ

## पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुंदर संगम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

सांस्कृतिक वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात लोककलेची संपन्न परंपरा आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकशाहीर आणि लोककलावंतांनी विविध लोककलेच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि जनजागृतीचे अमूल्य कार्य केले. आजही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा हा अविभाज्य भाग आहे. तथापि, काळाच्या ओघात अनेक लोककला लोप पावत असताना कोकणातील काही गाव-खेड्यांत या कला अजूनही सणासुदीला जिवंत राहिल्या आहेत. त्या मर्यादित न ठेवता पारंपरिकतेबरोबर आधुनिकतेचा संगम साधून त्या अधिक व्यावसायिक बनाव्यात, यासाठी कोकणातील अनेक संस्था आणि कलावंत प्रयत्नशील आहेत.

**बळीवंश कलामंच — कोकणातील लोककलेचा अभिमान**

कोकणात नावलौकिक मिळवलेला *बळीवंश कलामंच (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) हा त्यापैकीच एक उल्लेखनीय कलामंच आहे. पारंपरिक लोककलांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या श्री पाणबुडी देवी कलामंच, मुंबई यांच्या पुढाकाराने कोकणातील बहुप्रिय लोककला 'नमन' कलेच्या या मोसमातील शुभारंभाचा प्रयोग मुंबईत आयोजित करण्यात आला आहे.सोहळा मंगळवार,




दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८.३० वा. मा. दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथे रंगणार आहे

**'नमन लोककला गौरव पुरस्कार' आणि 'भजन सम्राट पुरस्कार' जाहीर**

कार्यक्रमादरम्यान संदीप तुकाराम सावंत आणि सतिश रामचंद्र जोशी यांना श्री पाणबुडी देवी, मुंबई पुरस्कृत स्व. शंकर (दादा) गोमाणे स्मृती प्रित्यर्थ 'नमन लोककला गौरव पुरस्कार – २०२५' प्रदान करण्यात येणार आहे. तसेच अनंत अशोक शेनॉय यांना स्व. शंकर (दादा) गोमाणे स्मृती प्रित्यर्थ 'भजन सम्राट पुरस्कार – २०२५' ने सन्मानित करण्यात येणार आहे.

**नवोदित कलावंत सागर डावल यांची नवी कलाकृती — "संस्कार"**

या कार्यक्रमात नवोदित नमन कलावंत शिवश्री सागर बबन डावल यांनी लिहिलेल्या "संस्कार" या नवीन वगनाट्य कलाकृतीचे प्रथम सादरीकरण होणार आहे. सागर डावल यांनी अल्पावधीत अनेक वगनाट्ये लिहून नमनकलेत आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. समाजप्रबोधनपर विषयांवर त्यांच्या कलाकृती सतत वेगवेगळे सामाजिक संदेश देतात.

**मुंबईकर कोकणवासीयांना आवाहन**

संयोजकांनी आवाहन केले आहे की, अथक परिश्रमपूर्वक साकारलेल्या या नमन प्रयोगाला कोकणवासीय मुंबईकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.अधिक माहितीसाठी संपर्क:

दिपक कारकर – ९९३०५८५१५३
रमेश भेकरे – ९५९४३५२८६३
संतोष घाणेकर – ९८३३६८९६४२
रमेश कोकमकर – ८८५०४२२७११

# सार्वजनिक वाहतुकीचे सामाजिक महत्त्व : मानवकेंद्री विकासाचा अनिवार्य मार्ग

**जगातील नागरीकरणाचा वेग दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांचा व्यापारी, औद्योगिक, शैक्षणिक आणि रोजगाराच्या संधींमुळे विस्तार होत असताना लोकसंख्येचे स्थलांतर, वस्त्यांची वाढ, दैनंदिन व्यवहारांमध्ये गुंफणारे आयुष्य आणि ताणतणावांनी भरलेला आधुनिक काळ यामधून होणारा प्रवास हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर १० नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा 'जागतिक सार्वजनिक वाहतूक दिन' केवळ वाहतुकीची सोय किंवा सुविधा यापुरता मर्यादित न राहता समाज, अर्थव्यवस्था, पर्यावरण, संस्कृती आणि विकास या सर्वांवर परिणाम करणाऱ्या वाहतूक प्रणालीच्या सामाजिक अर्थपूर्णतेकडे मानवी दृष्टीने पाहण्याची एक महत्त्वपूर्ण संधी निर्माण करतो. सार्वजनिक वाहतूक म्हणजे केवळ बस, रेल्वे, मेट्रो, ट्राम किंवा सार्वजनिक सायकल नेटवर्क एवढेच नव्हे, तर सामूहिक वापर, समान सहभाग आणि सबलीकरण यांची सामाजिक प्रक्रिया आहे. नागरिकांच्या सर्व घटकांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाच्या केंद्रस्थानी आणणारा हा लोकशाहीवादी वाहतुकीचा मार्ग आहे.**

आपल्या देशात आणि जगभरात वाढते खासगीकरण, वेगाने वाढणारी चारचाकी वा दुचाकी वाहने, रस्त्यांवरील रहदारीची कोंडी, प्रदूषणाचे प्राणघातक स्तर, संसाधनांचा अनियंत्रित वापर आणि वाढता इंधन खर्च यामुळे समाज अनेक संकटांसमोर उभा आहे. खासगी वाहनांचा वापर हा 'सोयीचा' वाटत असला, तरी तो समाजासाठी व पृथ्वीसाठी 'महागडा' ठरत आहे. खासगी वाहनाचं मालकत्व हे वैयक्तिक प्रतिष्ठा किंवा सामाजिक स्थानाचे प्रतीक मानण्याची प्रवृत्ती वाढत गेली, आणि त्यातून सामूहिकतेपेक्षा वैयक्तिकतेला' अधिक महत्त्व देण्याची वृत्ती अधिक बळकट झाली. परंतु सामाजिक आयुष्याचे खरे स्वास्थ्य हे सर्वांसाठी उपलब्ध, परवडणारी आणि समतोल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यावर अवलंबून आहे. कारण सार्वजनिक वाहतूक ही केवळ प्रवासाची पद्धत नसून ती समाजातील असमानता कमी करण्याचे प्रभावी साधन आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता वाहतूक ही सामाजिक संरचनेचा पाया आहे. शहराचे समाजशास्त्र, ग्रामीण-शहरी अंतर, स्त्री-पुरुष समानता, शिक्षण-अभ्यास-रोजगाराच्या संधींतील समानता, आर्थिक गतिशीलता, सामाजिक परस्परसंबंध आणि पर्यावरणपूरक जीवनशैली हे सर्व वाहतूक व्यवस्थेशी खोलवर निगडित आहेत. उदा. ज्यांच्या राहण्याची व्यवस्था शहरापासून दूर किंवा उपनगरात असते, त्यांना रोजगार, शिक्षण



किंवा आरोग्यसेवांपर्यंत पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतूक ही जीवनरेखा ठरते. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सार्वजनिक वाहतूक ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे, तर महिलांसाठी ती सुरक्षिततेचे कवच आहे. ग्रामीण भागातील मजुरी करणारे लोक, शिक्षणासाठी शहरात येणारे विद्यार्थी, नोकरीसाठी प्रवास करणारे कर्मचारी, उद्योगात काम करणारे कामगार, वृद्ध, विद्यार्थी, महिला, दिव्यांग या सर्वांसाठी सार्वजनिक वाहतूक म्हणजे जीवनाला जोडणारा पूल आहे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार आणि गुणवत्ता ही आर्थिक विकासाची किल्ली ठरते. बेंगळुरू, पुणे, मुंबई, दिल्ली, नागपूर यांसारख्या शहरांत मेट्रो, बीआरटीएस, ई-बस, सब-अर्बन रेल्वे आदी प्रकल्प समाजाला पुढे नेण्याचे उदाहरण आहेत. सार्वजनिक वाहतुकीचा दर्जा जिथे चांगला असतो तिथे लोकांचा प्रवास सुखकर, प्रदूषण कमी, कामाच्या संधी वाढलेल्या आणि मानसिक ताण कमी झालेला दिसतो. परंतु याच वेळी, अनेक शहरांत सार्वजनिक वाहतुकीची अवस्था अजूनही अपुरी व विस्कळीत आहे. बसेस कमी, रेल्वे गाड्यांमध्ये गर्दी, बसस्थानकांची दुरवस्था, सुरक्षा उपायांचा अभाव, अपंगांसाठी सुविधा नसणे, प्रवासाची अस्वस्थता यामुळे अनेक लोक सार्वजनिक वाहतुकीकडून दूर जातात. या परिस्थितीने खासगी वाहनांचा वापर वाढतो, आणि वाहतूक कोंडी, अपघात, प्रदूषण, वेळेचा अपव्यय, ताणतणाव या समस्या वाढत जातात. म्हणूनच, सार्वजनिक वाहतुकीत गुंतवणूक हा खर्च नसून समाजाची भविष्यातील गुंतवणूक आहे.

खासगी वाहनांमुळे होणारे वायूप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, जैवविविधतेचा नाश, तापमानवाढ, हवामान बदल, भूमीचे व्यापारीकरण आणि पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व हे संपूर्ण मानवजातीपुढील मोठे धोके आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालांनुसार प्रदूषित हवेचे दुष्परिणाम हे श्वसनविकार, हृदयरोग, कर्करोग, स्ट्रोक यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरतात. जर सार्वजनिक वाहतूक मजबूत, सुबक आणि सुलभ असेल तर लाखो लोक खासगी वाहनांचा वापर सोडण्यास तयार होतात. यामुळे पर्यावरणाचे रक्षण, सार्वजनिक आरोग्य सुधारणा आणि संसाधनांचा शाश्वत वापर साध्य होऊ शकतो. आजच्या काळात ई-बस, सायकल-शेअरींग, कारपूलिंग, मेट्रो रेल्वे, हरित ऊर्जा आधारित वाहतूक व्यवस्था आणि स्मार्ट तिकिटिंग प्रणाली यांचा वापर वाढू लागला आहे. तंत्रज्ञान आणि वाहतूक व्यवस्थापनाचा संगम हा भविष्यातील वाहतुकीचा पाया आहे. पण तंत्रज्ञानाचा वापर हा माणसांना केंद्रस्थानी ठेवूनच झाला पाहिजे. वाहतूक हे फक्त वाहनांचे व्यवस्थापन नाही; ती लोकांच्या चालण्याची, जगण्याची आणि समाजाशी जोडले जाण्याची प्रक्रिया आहे.

महिला आणि सार्वजनिक वाहतूक हा एक महत्त्वाचा विषय आहे. सुरक्षित, स्वच्छ, प्रकाशयुक्त, सुरक्षा यंत्रणांनी युक्त, महिलांसाठी अनुकूल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी अत्यावश्यक आहे. अनेक वेळा असुरक्षिततेमुळे महिला शिक्षण, नोकरी किंवा सामाजिक सहभाग यांपासून दूर राहतात. म्हणूनच सुरक्षित सार्वजनिक वाहतूक ही स्त्री-पुरुष समानता घडविण्यासाठी महत्त्वाची कडी आहे.

ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक अधिकच महत्त्वपूर्ण ठरते. तिथे लोक शेती, मजुरी, बाजारपेठ, शाळा, रुग्णालये, सरकारी सेवांपर्यंत पोहोचण्यासाठी बस, सामुदायिक वाहने किंवा स्थानिक सार्वजनिक वाहतुकीवर अवलंबून असतात. ग्रामीण वाहतुकीची कमतरता ही ग्रामीण भागातील लोकांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागे ठेवते. त्यामुळे ग्रामीण वाहतुकीचा विकास हा ग्रामीण विकासाचा मूलाधार मानला पाहिजे.

सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग केवळ प्रवासातच नाही तर सामाजिक संवाद वाढण्यातही होतो. बसमध्ये किंवा रेल्वेत प्रवास करताना विविध स्तरातील, मतांतील, संस्कृतीतील लोक एकत्र येतात. त्यातून सामाजिक एकजूट, संवाद आणि सांस्कृतिक समन्वय निर्माण होतो. खासगी वाहनांमुळे निर्माण होणारा 'एकाकीपणा' इथे कमी होतो. म्हणजेच सार्वजनिक वाहतूक ही लोकांना जोडणारी लोकशाहीवादी जागा आहे.

आजच्या तरुण पिढीसमोर पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि आरोग्य याबाबत चिंतेचे प्रश्न आहेत. अशावेळी सार्वजनिक वाहतूक स्वीकारणे हे सामाजिक जबाबदारीचे पाऊल मानले पाहिजे. जागतिक स्तरावर 'ग्रीन मोबिलिटी', 'कार्बन न्यूट्रल सिटी', 'सस्टेनेबल अर्बन डेव्हलपमेंट' यांसारख्या संकल्पना विकसित होत आहेत. त्यांचा मूळ केंद्रबिंदू सार्वजनिक वाहतुकीवर आधारित शहररचना आहे.

सारांशतः, सार्वजनिक वाहतूक ही आधुनिक समाजाच्या चौफेर प्रगतीसाठी अनिवार्य आहे. ती समानता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, आर्थिक विकास, सांस्कृतिक बंध, आरोग्य व जीवनमान सुधारणा यासाठी संधी निर्माण करणारी समाजाचा कणा आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीला केवळ सेवा म्हणून नव्हे, तर जनहिताचा अधिकार, लोकशाहीचा आधारस्तंभ आणि शाश्वत विकासाचा मार्ग म्हणून मान्यता दिली पाहिजे.

आज 'जागतिक सार्वजनिक वाहतूक दिन' हा केवळ स्मरण आणि औपचारिकता न राहता, नागरिक, सरकार, शहररचना तज्ञ, वाहतूक अधिकारी, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, आणि जनसामान्य यांनी एकत्रितपणे सार्वजनिक वाहतुकीच्या सशक्तीकरणाची प्रतिज्ञा घ्यायला हवी. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवून, ती अधिक सुरक्षित, सुलभ, स्वच्छ, परवडणारी आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे. कारण सार्वजनिक वाहतूक मजबूत झाली, तर समाज मजबूत होईल; समाज मजबूत झाला, तर मानवजातीचा भविष्यकाळही अधिक सुरक्षित, समतोल आणि शाश्वत होईल.

**डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# अभिनेता वरुण धवननं आपल्या सोशल मीडियावर शेअर केला 'हुक्की'चा फर्स्ट लुक...



मराठी चित्रपटसृष्टीत हॉरर-कॉमेडी चित्रपट प्रेक्षक खूप पसंत करतात. आता चार मित्रांची गोष्ट सांगणारा 'हुक्की' हा आगामी मराठी चित्रपटही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'हुक्की'च्या पहिल्या पोस्टरनंतर या चित्रपटाचा फर्स्ट लुक नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. दमदार कलाकारांची फौज या चित्रपटामध्ये दिसणार आहे. एक वेगळ्या विषयावर आधारित चित्रपट असल्यानं 'हुक्की'च्या फर्स्ट लुकनं रसिकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर 'हुक्की'च्या फर्स्ट लुकची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीचा अभिनेता वरुण धवननं 'हुक्की'चा फर्स्ट लुक आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे.

**'हुक्की' चित्रपटाचं फर्स्ट लुक उत्साह वाढविणारे :** निर्माते नितीन रोकडे, सुनंदा काळुसकर, श्वेता संजय ठाकरे, विनायक पाष्टे तसेच सहनिर्माते सुधीर खोत आणि रईस खान यांनी मॅजिक स्वान स्टुडिओज आणि एनएमआर मुव्हीज या बॅनरखाली 'हुक्की' चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. कथालेखनासोबतच या चित्रपटाचं दिग्दर्शन नितीन रोकडे यांनी केलंय. 'हुक्की'चा फर्स्ट लुक खऱ्या अर्थानं रसिकांचा उत्साह वाढविणारा आहे. कावळ्याचा लालभडक डोळा उघडतो आणि फर्स्ट लुकची सुरुवात होते. त्यानंतर समुद्रकिनारी कोळी बांधव होडी ओढत असल्याचं दृश्य पाहायला मिळते. या दृश्यामागोमाग तीन तरुण आणि एक तरुणी यांची चौकडी चालत येत असल्याचं दिसते. त्यांना फोर लूझर्स असे संबोधले गेले आहे. त्यानंतर एक भयावह रात्र सुरू होते. या रात्री चौघेही विचित्र परिस्थितीत अडकतात. फर्स्ट लुक पाहिल्यावर 'हुक्की' या हॉरर कॉमेडीपटात प्रवाहापेक्षा वेगळे कथानक पाहायला मिळणार असल्याची जाणीव होते.

**'हुक्की' चित्रपटातील मुख्य स्टार :** महाराष्ट्राचा लाडका अभिनेता प्रथमेश परब आणि विनोदाचा बादशाह पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी या चित्रपटात दिसणार आहेत. दरम्यान या चित्रपटाच्या फर्स्ट लुकबाबत नितीन रोकडे यांनी सांगितलं, "हुक्की'च्या कथानकाचा बाज लक्षात घेऊन फर्स्ट लुक तयार करण्यात आला आहे. हा फर्स्ट लुक अत्यंत कमी वेळात आपले काम चोख बजावणारा आहे. हॉरर-कॉमेडीपटासाठी पोषक ठरणारी वातावरणनिर्मिती, कलाकारांचा लूक, पार्श्वसंगीत, सबटायटल्स यांचा सुरेख वापर 'हुक्की'च्या फर्स्ट लुकमध्ये आहे. त्यामुळं प्रेक्षकांना सिनेमागृहांपर्यंत आणण्यात फर्स्ट लुक महत्त्वाची भूमिका बजावणार आहे."

**'हुक्की' चित्रपटाबद्दल :** दिग्दर्शक नितीन रोकडे यांनी संदीप कुमार रॉय आणि मधुलीता दास यांच्याबरोबर 'हुक्की'ची पटकथाही लिहिली आहे. या चित्रपटात प्रथमेश-पॅडीबरोबर रावी किशोर, प्रशांत मोहिते, महेश पाटील, मोहक कंसारा, आरती चौबल, वर्षा धांदले, आणि पंकज विष्णू आदी कलाकार आहेत. संगीतकार राघवेंद्र व्ही आणि प्रफुल-स्वप्नील यांनी या चित्रपटातील गीतरचना संगीतबद्ध केल्या असून साऊथमधील सुप्रसिद्ध संगीतकार, राघवेंद्र व्ही 'हुक्की'द्वारे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करीत आहेत. डिओपी फारुख खान यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, नृत्य दिग्दर्शन संतोष गणपत पालवणकर आणि इमरान मालगुणकर यांनी केले आहे. या चित्रपटातील थरारक साहस दृश्ये संष कुमार आणि नितीन रोकडे यांनी डिझाईन केली आहेत.

# इमोशनल लव्ह ड्रामा लास्ट स्टॉप खांदाचा ट्रेलर रिलीज

सध्या जोरदार चर्चेत असलेल्या 'लास्ट स्टॉप खांदा…' या चित्रपटातून प्रेमाचा इमोशनल, कॉमेडी ड्रामा उलगडणार आहे. उत्तम लेखन, अभिनय, संगीत असलेला, पुरेपूर मनोरंजन करणारा हा चित्रपट २१ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार असून, चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. शिवम फिल्म क्रिएशन सिग्नेचर ट्यून्स, स्नेहा प्रॉडक्शन्स यांनी "लास्ट स्टॉप खांदा… " प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सचिन कदम आणि सचिन जाधव यांनी या चित्रपटाती प्रस्तुती केली आहे. प्रदीप मनोहर जाधव हे या चित्रपटाचे निर्माते असून सचिन कदम, अमृता सचिन जाधव सहनिर्माते आहेत. श्रमेश बेटकर लिखित या चित्रपटाचं दिग्दर्शन विनित परुळेकरनी केलं आहे.

या चित्रपटात अभिनेता श्रमेश बेटकर अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने, मंदार मांडवकर, शशिकांत केरकर, सुदेश जाधव, महेश कापरेकर, प्रियांका हांडे, डॉ. सचिन वामनराव, गणेश गुरव, निशांत जाधव, गिरीश तेंडुलकर, जयश्री गोविंद अशी तगडी स्टारकास्ट आहे. तर पाहुणे कलाकार म्हणून प्रभाकर मोरे, धनश्री काडगावकर, अशोक ढगे हे आपल्या भेटीस येणार आहेत. चित्रपटाचं छायांकन हरेश सावंत यांचं असून कलादिग्दर्शक केशव ठाकुर आहेत. संगीत श्रेयस राज आंगणे यांचे आहे, तर नृत्यदिग्दर्शन राहुल बनसोडे, रवी आखाडे यांचे आहे.




प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट 'लास्ट स्टॉप खांदा' या चित्रपटातून पहायला मिळणार आहे. नावापासूनच चर्चेत असलेल्या या चित्रपटातलं 'शालू झोका दे गो मैना'सह टायटल साँग, टीजरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. एका तरुणाचं त्याच्या लहानपणापासून एका मुलीवर प्रेम असतं, पण ते प्रेम यशस्वी झालेलं नसतं. मात्र, त्या मुलीचं तिच्या प्रियकराशी ब्रेकअप होताच, हा तरुण पुन्हा एकदा तिच्या अनेक वर्षांनी आयुष्यात आपलं स्थान शोधण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नात तो यशस्वी होतो की नाही याची मनोरंजक गोष्ट "लास्ट स्टॉप खांदा" या चित्रपटात पहायला मिळणार आहे. अनेक चढउतार असलेल्या या कथानकातून प्रेम या संकल्पनेचा हलक्याफुलक्या पद्धतीनं शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमधून हलकीफुलकी कथा, खुसखुशीत संवादाची फोडणी असल्याचं पहायला मिळत आहे. त्यामुळे आता या चित्रपटाविषयीची उत्कंठा निर्माण झाली आहे. हा चित्रपट २१ नोव्हेंबरपासून चित्रपटगृहात पाहता येणार आहे.

# अक्षय कुमार आणि जॉन अब्राहम स्टारर 'गरम मसाला'बद्दल प्रियदर्शननं केला मोठा खुलासा, वाचा सविस्तर...




अभिनेता अक्षय कुमार आणि जॉन अब्राहम यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केलंय. 'गरम मसाला' हा त्यांचा खूप गाजलेला चित्रपट आहे. त्यांच्या कॉमिक टायमिंगचं प्रेक्षकांनी खूप कौतुक केलं होतं. यानंतर त्यांनी 'देसी बॉईज' चित्रपटातही एकत्र काम केलं. हा चित्रपट देखील त्यांचा खूप गाजला होता. तसेच अक्षय आणि जॉनची जोडी प्रेक्षकांना जास्त 'गरम मसाला' या चित्रपटामध्ये खूप आवडली. या चित्रपटाबद्दल म्हटलं जाते की, अक्षय कुमारनं त्याचा सहकलाकार जॉनची भूमिका कमी केली होती. आता चित्रपटाचे दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी या अफवेबद्दल स्पष्टीकरण दिलं आहे.

**अक्षय कुमारनं जॉन अब्राहमची भूमिका चित्रपटातून कमी केली ? :** अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीत, प्रियदर्शन यांनी अक्षय कुमारच्या अभिनयाचं कौतुक करत म्हटलं होत, "तो खूप विनोदी होता. 'हेरा फेरी'नंतर अक्षयनं पुन्हा एकदा माझ्या दिग्दर्शनात त्याचं कॉमिक टायमिंग दाखवलं आणि प्रेक्षकांना ते पसंत पडलं. वैयक्तिकरित्या, मला वाटते की 'गरम मसाला' या चित्रपटात अक्षयचा कॉमिक टायमिंग 'हेरा फेरी'प्रमाणेच चांगला होता." यानंतर प्रियदर्शनला जॉनची भूमिका कमी केल्याच्या प्रश्नावर त्यांनी सांगितलं, "हे सर्व अफवा आहे." तुम्हाला वाटते की, अक्षय कोणत्याही अभिनेत्याबद्दल अशी भावना ठेवणार ? अशा अफवा ईर्ष्या करणारे लोक त्यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी करतात. अक्षय हा त्याच्या प्रमाणिकपणा, कठोर परिश्रम आणि प्रतिभेमुळं आज चित्रपटसृष्टीत इतक्या दिवसांपासून टीकून आहे."

**अक्षय कुमार करणार प्रियदर्शनबरोबर 'हे' चित्रपट :** दरम्यान अक्षय कुमार हा प्रियदर्शनबरोबर दोन आगामी चित्रपटांमध्ये काम करणार आहे. यामध्ये एक 'भूत बंगला' आणि दुसरा 'हैवान' यांचा समावेश आहेत. या दोन्ही चित्रपटांमध्ये धमाकेदार कॉमेडी पाहायला मिळणार आहे. तसेच 'गरम मसाला' या चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर या चित्रपटामध्ये अक्षय आणि जॉन यांनी प्रमुख भूमिकेत काम केलं होतं. याशिवाय चित्रपटामध्ये परेश रावल, राजपाल यादव , मनोज जोशी, रिमी सेन आणि असरानी यांनीही विशेष भूमिका केल्या होत्या.

# ग्रॅमी नामांकनामध्ये रॅपर केंड्रिक लॅमर शर्यतीत आघाडीवर, पॉप गायिका लेडी गागा दुसऱ्या क्रमांकावर

ग्रॅमी पुरस्कार १ फेब्रुवारी २०२६ रोजी लॉस एंजेलिसमधील क्रिप्टो डोम कॉम अरेना येथे आयोजित केले जातील. २०२६च्या ग्रॅमी पुरस्कारांसाठी नामांकने गेल्या शुक्रवारी जाहीर करण्यात आली. यावेळी, प्रसिद्ध रॅपर केंड्रिक लॅमर ग्रॅमी शर्यतीत आघाडीवर आहे, त्यांना एकूण नऊ श्रेणींमध्ये नामांकने मिळाली आहेत. दरम्यान, जगप्रसिद्ध पॉप गायिका लेडी गागा यांना सात नामांकने मिळाली आहेत. ती यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. ग्रॅमी पुरस्कार २०२६च्या नामांकनांची संपूर्ण यादी येथे पाहा.

**अल्बम ऑफ द इयर (Album of the Year)**

बॅडी बनी देबी तिरार मास फोटोज (Bad Bunny Debí Tirar Más Fotos)

क्लिप्स (पूशा टी एंड मैलिस) लेट गॉज सॉर्ट आउट (Clipse (Pusha T & Malice) Let God Sort Em Out)

जस्टिन बीबर स्वॅग (Justin Bieber Swag)

केंड्रिक लॅमर जीएनएक्स (Kendrick Lamar GNX)

लेडी गागा मेहेन (Lady Gaga Mayhem)

लियोन थोमस मट (Leon Thomas Mutt)

सबरीना कारपेंटर मंस बेस्ट फ्रैंड (Sabrina Carpenter Mans Best Friend)

टेलर, द क्रिएटर क्रोमाकोपिया (Tyler, the Creator Chromakopia)

**सॉन्ग ऑफ द इयर (Song of the Year)**

बॅड बनी डीटीएमएफ ( Bad Bunny DTMF)

बिली आयलीश वाइल्डफ्लॉवर (Billie Eilish Wildflower)

डोईची अँक्सायटी (Doechii Anxiety)


हंटर/एक्स गोल्डन (Huntr/x Golden)

केंड्रिक लॅमर आणि एसझेडए ल्थूयर (Kendrick Lamar & SZA Luther)

लेडी गागा अब्राकाडाब्रा (Lady Gaga Abracadabra)

रोझ आणि ब्रुनो मार्स एप्ट(Rosé & Bruno Mars Apt. )

सबरीना कारपेंटर मॅनचाइल्ड (Sabrina Carpenter Manchild)



**रिकॉर्ड ऑफ द इयर(Record of the Year)**

बॅड बनी डीटीएमएफ (Bad Bunny DTMF)

बिली एलिश वाइल्डफ्लोवर (Billie Eilish Wildflower)

चॅपल रॉन द सब्वे (Chappell Roan The Subway)

डोएची एन्जॉयटी (Doechii Anxiety)

केंड्रिक लॅमर एंड एसजेडए ल्थूयर (Kendrick Lamar & SZA Luther)

लेडी गागा आब्राकाडाब्रा (Lady Gaga Abracadabra)

रोड एंड ब्रूनो मार्स एप्ट (Rosé & Bruno Mars Apt.)

सबरीना कारपेंटर मॅनचाइल्ड (Sabrina Carpenter Manchild)

**बेस्ट न्यू आर्टिस्ट (Best New Artist)**

एडिसन राई (Addison Rae)

एलेक्स वॉरेन (Alex Warren)

काटसेये (Katseye)

लियोन थोमस (Leon Thomas)

लोला यंग (Lola Young)

द मॅरियास (The Marías)

ओलिविया डीन (Olivia Dean)

सोंब्र (Sombr)

**प्रोड्यूसर ऑफ द इयर (गैर-शास्त्रीय) Producer of the Year, Non-Classical**

ब्लॅक मिल्स (Blake Mills)

सर्कट (Cirkut)

डॅन ऑरबैच (Dan Auerbach)

डाजोन (Dijon)

सौनवेव (Sounwave)

**सॉन्गराइटर ऑफ द इयर (गैर-शास्त्रीय) Songwriter of the Year, Non-Classical**

एमी एलेन (Amy Allen)

एडगार बेरेरा (Edgar Barrera)

जैसी जे डिल्लन (Jessie Jo Dillon)

लौरा वेल्टज (Laura Veltz)

टोबियस जैसो जूनियर (Tobias Jesso Jr.)

बेस्ट पॉप सोलो परफॉर्मेंस Best Pop Solo Performance

चॅपल रॉन द सब्वे (Chappell Roan The Subway)

जस्टिन बीबर डायसिस (Justin Bieber Daisies)

लेडी गागा डिसीज (Lady Gaga Disease)

लोला यंग मैसी (Lola Young Messy)

सबरीना कारपेंटर मॅनचाइल्ड(Sabrina Carpenter Manchild)

**बेस्ट पॉप/डुओ ग्रुप परफॉर्मेंस Best Pop/Duo Group Performance**

सिंथिया एरिवो एंड अरियाना ग्रैनडे डिफाइंग ग्रेवटी (Cynthia Erivo & Ariana Grande Defying Gravity)

हंटर एक्स गोल्डन (Huntr/x Golden)

कॅटसेय गैब्रियाला (Katseye Gabriela)

रोज एंड ब्रूनो मार्स एप्ट. (Rosé & Bruno Mars Apt.)

एसजेडए विद कैंड्रिक लेमर 30 फॉर ३०(SZA with Kendrick Lamar 30 for ३०).


# देवपूजा करताना किती अगरबत्ती लावाव्यात? जाणून घ्या धार्मिक आणि वैज्ञानिक कारणे

दररोज सकाळी आणि संध्याकाळी देवासमोर पूजा करणं ही आपल्या भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. प्रार्थना, दिवा आणि अगरबत्ती हे तीन घटक पूजेचं सौंदर्य वाढवतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का, देवासमोर अगरबत्ती का लावतात आणि किती अगरबत्ती लावाव्यात? या साध्या दिसणाऱ्या परंपरेमागे धार्मिक आणि वैज्ञानिक दोन्ही कारणं दडलेली आहेत.

**१. पूजा म्हणजे मन आणि वातावरण शुद्ध करणं**

हिंदू धर्मात पूजेला केवळ धार्मिक नव्हे तर मानसिक शांतीचा मार्ग मानला जातो. देवासमोर अगरबत्ती लावल्याने घरात सुगंध पसरतो, ज्यामुळे वातावरणात सकारात्मकता निर्माण होते. मन शांत होतं आणि एकाग्रता वाढते. म्हणूनच म्हणतात, अगरबत्ती लावणं म्हणजे केवळ श्रद्धा नव्हे तर मनशांतीचं प्रतीक आहे.

**२. किती अगरबत्ती लावाव्यात?**



धार्मिक मान्यतानुसार, पूजेदरम्यान दोन अगरबत्ती लावणं अत्यंत शुभ मानलं जातं. दोन अगरबत्ती म्हणजे संतुलन एक सकारात्मक ऊर्जेसाठी आणि दुसरी नकारात्मक ऊर्जेचा नाश करण्यासाठी. काही विशेष धार्मिक विधींमध्ये चार अगरबत्ती लावल्या जातात. असं मानलं जातं की चार दिशांचा आशीर्वाद मिळावा म्हणून चार अगरबत्ती लावणं शुभ ठरतं. यामुळे घरात शांती, समृद्धी आणि ऐक्य टिकून राहतं.

**३. धार्मिक महत्त्व**

अगरबत्ती लावणं हे देवाप्रती आदर आणि शुद्धतेचं प्रतीक मानलं जातं. पूजेच्या वेळी सुगंधी धूर देवाला अर्पण केल्यास, तो प्रार्थनेचा संदेश आकाशात पोहोचवतो असं मानलं जातं. हिंदू शास्त्रांमध्ये लिहिलं आहे की अगरबत्तीचा धूर घरातील नकारात्मक ऊर्जा कमी करून वातावरण पवित्र करतो. म्हणून प्रत्येक देवपूजेत अगरबत्तीचा वापर अनिवार्य मानला जातो. आणि धार्मिक सकारात्मक ऊर्जेपेक्षा कमी वातावरण पवित्र करतो.

**४. अगरबत्तीचं वैज्ञानिक कारण**

वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिलं तर अगरबत्ती लावल्याने वातावरणातील सूक्ष्म जीवाणू आणि कीटकांचा नाश होतो. पारंपरिक अगरबत्तीमध्ये वापरले जाणारे नैसर्गिक घटक जसे चंदन, लवंग, तुळस किंवा कपूर हे वातावरण शुद्ध करण्याचं काम करतात. त्यामुळे हवेतील प्रदूषण कमी होतं आणि घरातील हवेची गुणवत्ता सुधारते.

**५. अगरबत्ती म्हणजे आनंद आणि समृद्धीचं प्रतीक**

घरात दररोज अगरबत्ती लावल्याने मनात समाधान निर्माण होतं. सुगंधी वातावरणामुळे तणाव कमी होतो आणि घरात सौहार्द वाढतं.




**मेष** – अधिक संवेदनशील व्हाल. दिवस आनंदात जाईल. उग्र चर्चा करू नका. आर्थिक मदत मिळेल. कला क्षेत्रात चमकाल.

**वृषभ** – आपल्या नोकरीत फायदेशीर बदल करता येतील. मान-सन्मानाचा योग येईल. रागीट आणि हट्टी स्वभावाला मुरड घाला.

**मिथुन** – आकस्मिक पैसे खर्च होतील. गृहस्थ जीवनात सुख आणि आनंद मिळेल. तणाव कमी करण्याचा प्रयत्न करता येईल. नोकरीत बदलीचा प्रश्न सुखकारक ठरू शकतो.

**कर्क** – कार्यक्षेत्रात आपला प्रभाव टिकून राहील. कलाकारांना प्रतिभा दाखवण्याची संधी मिळेल. बोलण्यातून गैरसमज होऊ शकतो.

**सिंह** – प्रतिष्ठेचा बडेजाव न करता कामे करा. शेजारी मदत करतील. सरकारी कामात यश मिळेल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा.

**कन्या** – नकारात्मक विचारांपासून दूर राहा. आर्थिक कार्यात लाभ मिळेल. पाल्यांसाठी पैसे खर्च होऊ शकतात. नवीन परिचय होतील.

**तूळ** – महत्त्वाची वस्तू नीट सांभाळा. नोकरीत कामाचा व्याप वाढेल. कोर्टाच्या कामात यश मिळेल. आनंददायी पर्यटन होईल.

**वृश्चिक** – आत्मविश्वासाने काम केल्याने यश मिळेल. सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा लाभेल. सहकाऱ्यांशी मिळते जुळते धोरण ठेवा.

**धनु** – संमिश्र स्वरूपाचे वातावरण राहील. आळस करू नका. सोबत काम करणाऱ्यांचे सहकार्य मिळेल. विचारांना चालना मिळेल.

**मकर** – कुटुंबीय तसेच मित्रांसोबत वेळ घालवाल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. वाहन जपून चालवा. प्रयत्नाने कामे मार्गी लागतील.

**कुंभ** – तब्येत उत्तम राहील. एखादी उत्साह वाढवणारी घटना घडेल. आपल्या बोलण्यावर आणि वर्तनावर संयम ठेवावा लागेल.

**मीन** – नव्या कामाचा शुभारंभ करू शकता. आरोग्यावर पैसे खर्च होतील. मोहाला बळी पडू नका. इतरांशी नम्रपणे बोलावे. राजकारणात चौफेर लक्ष देण्याचा त्रास वाढेल.

# “आपण तयार झालो तर संधी आपल्या दारात” – भाजप नेते प्रितम म्हात्रे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल परिसरातील तरुणांच्या रोजगार, कौशल्यविकास आणि समाजकारण विषयक संधींवर सविस्तर चर्चा करण्यासाठी एक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत भाजप नेते श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल परिसरातील विविध सार्वजनिक मंडळातील सदस्य आणि परिसरातील तरुण उपस्थित होते. बैठकीचा उद्देश केवळ चर्चा नसून, तरुणांना रोजगाराच्या प्रत्यक्ष संधी उपलब्ध करून देण्याचा कृती आराखडा ठरवणे हा होता.

पनवेल परिसरात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, तळोजे औद्योगिक क्षेत्र, सिडकोचे प्रकल्प आणि जेएनपीटी विस्तार योजना अशा अनेक मोठ्या विकासकामांमुळे हजारो रोजगार निर्माण होत आहेत.

लोडर, हेल्पर, सिक्युरिटी गार्ड, सुपरवायझर, टेक्निशियन, ड्रायव्हर, ऑफिस असिस्टंट, अकाउंट असिस्टंट अशा विविध पदांसाठी मोठी मागणी आहे.

“आपल्याला बाहेर रोजगार शोधायची गरज नाही — संधी आपल्या परिसरातच आहे, फक्त तयारी हवी,” असे श्री. प्रितम म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

**सामाजिक जबाबदारी आणि सेवा**

श्री.प्रितम म्हात्रे यांनी सांगितले की, फक्त रोजगार नव्हे तर सेवा हीच आपली ओळख आहे. जे एम म्हात्रे चॅरिटेबल माध्यमातून पनवेल परिसरात ना-नफा ना-तोटा तत्त्वावर ॲम्बुलन्स सेवा सुरू असून, गरजू नागरिकांना मोफत सुविधा दिली जाते. तसेच मयत झालेल्या कुटुंबांना अंत्यसंस्कारापासून डेथ सर्टिफिकेटपर्यंत सर्व सहकार्य दिले जाते.




“आपण एकत्र आलो, म्हणजे बदल नक्की घडेल. आज आम्ही फक्त चर्चा नाही, तर कृतीची दिशा ठरवण्यासाठी आलो होतो .प्रत्येक बैठक ही नवीन संधी घेऊन यावी आणि प्रत्येक तरुण हा आपल्या क्षेत्राचा अभिमान बनावा, हाच आपला हेतू आहे, दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या आणि नोकरीची गरज असलेल्या तरुणांनी थेट त्यांच्या भारतीय जनता पार्टी प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधावा, त्यांना त्यांच्या योग्यतेनुसार काम उपलब्ध करून देण्यासाठी पूर्ण सहकार्य केले जाईल.

श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे
मा.विरोधी पक्षनेता
पनवेल महानगरपालिका

# “इतना सन्नाटा क्यों है भाई?”

## विचारांना हादरवणारा नाट्यप्रयोग १८ नोव्हेंबरला ठाण्यात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी (प्रसाद हनुमंते )** :६४व्या मराठी राज्य नाट्यस्पर्धेअंतर्गत महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था, नवीन पनवेल आणि रिफ्लेक्शन थिएटर प्रस्तुत तसेच पनवेलचे उद्योजक व गुजराती नाटक निर्माते श्री. दिपक मिराणी यांच्या निर्मितीतील सामाजिक आशयाने परिपूर्ण आणि भावविश्वाला भिडणारं “इतना सन्नाटा क्यों है भाई?” हे नाटक दि. १८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६:३० वाजता, डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह (मिनी थिएटर), ठाणे येथे रंगणार आहे.

या नाटकाचं लेखन आणि दिग्दर्शन संकेत गायकवाड यांनी केलं असून, आजच्या समाजातील न बोललेले प्रश्न आणि मनुष्याच्या अस्तित्वाला हादरवणाऱ्या सत्यांना भिडणारा हा प्रयोग प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विषयाच्या गूढतेमुळे आणि मांडणीच्या वेगळेपणामुळे रंगभूमी वर्तुळात या नाटकाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.



पनवेल शहरातील अनेक गुणी कलाकारांच्या प्रभावी सहभागामुळे या नाटकाला एक वेगळी ओळख प्राप्त झाली आहे.

या सशक्त निर्मितीचे नाट्यव्यवस्थापक व सूत्रधार मृन्मय काणे, तसेच सोशल मीडिया प्रमुख आणि कास्टिंग डायरेक्टर प्रसाद हनुमंते हे अत्यंत दक्षतेने कार्यरत आहेत. जवळपास २० कलावंतांच्या दमदार अभिनयाने सजलेलं हे सादरीकरण तांत्रिक, दृश्यात्मक आणि भावनिक पातळीवर प्रेक्षकांना भारून टाकेल.

नाटकाला विशेष सहाय्य म्हणून माजी नगरसेवक श्री. राजू सोनी (पनवेल महानगरपालिका), सामाजिक कार्यकर्ते व कलावंत एन. डी. खान, माजी नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, मॉडेल व अभिनेत्री मिस दिपा पुण्यार्थी, अल्ट्रा लुब्रिकंट्सचे सीईओ सिद्धेश सावंत, उद्योजक समीर माखिजा, पत्रकार संतोष शिवदास आमले आणि इतर मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले आहे. मीडिया पॅटर्नर दैनिक युवक आधार असून त्यांच्या सहकार्यामुळे या नाट्यप्रयोगाची व्याप्ती आणि उंची अधिक वाढली आहे.

पनवेलच्या कलाकारांकडून ठाण्याच्या रंगभूमीवर सादर होणारा हा प्रयोग नव्या विचारांना दिशा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जातोय.१८ नोव्हेंबरची सायंकाळ ठाण्याच्या रंगमंचावर एक विचारांना हादरवणारा क्षण ठरणार आहे, अशी रंगभूमीविश्वात चर्चा रंगली आहे. “या नाट्यप्रयोगात विचार, भावना आणि वास्तव यांचं संगम पाहायला मिळणार आहे — त्यामुळे प्रचंड संख्येने उपस्थित राहून त्या क्षणांचे साक्षीदार बनूया!”

# उमरखेड तालुक्यात ओपन जागी जिल्हा परिषद लढवणार आदिवासी कृती समिती

## आदिवासी कृती समितीच्या पोफाळ,नींगनूर,बिटरगांव सर्कल च्या बैठकी संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजू गायकवाड उमरखेड तालुका प्रतिनिधी**

सध्या राजकीय रणधुमाळी चालू असून नगरपंचायत, नगरपरिषद, यांच्या निवडणूकीचे बिगुल वाजले असून त्यानंतर लगेच जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक होणार आहे.अशातच उमरखेड तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सहा गटात अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित जागा नसल्याने आदिवासी कृती समिती उमरखेड यांनी दिनांक २२ ऑक्टोबर रोजी निंगणुर येथे झालेल्या बैठकीत खुल्या प्रवर्गातील पोफाळी, निंगणुर आणि बिटरगाव या तिनही जिल्हा परिषदेच्या जागेवर निवडणूक लढवण्याचे एकमताने बैठकीत ठरले होते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ८ नोव्हेंबर रोजी धनज येथे फुलाजी बाबा समाज भवनात पोफाळी जिल्हा परिषद गटातील आदिवासी कृती समितीमार्फत बैठक घेण्यात आली तर नींगनूर आणि बिटरगाव येथील सर्कल च्या बैठकी 9 नोव्हेंबर रोजी घेण्यात आल्या या बैठकीत आदिवासी कृती समितीमार्फत जिल्हा परिषद गटातील खुल्या प्रवर्गातून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या आदिवासी बांधवाचे नावे घेण्यात आली हे नावे निश्चित केल्यानंतर निवडणूक सुकाणू समिती उमेदवाराची योग्य निरीक्षण करून प्रत्येकी गटनिहाय एक सर्व समावेशक सर्वमान्य असा उमेदवार निश्चित करणार असल्याचे समितीमार्फत सांगण्यात आले.लवकरच तिन्ही गटातील उमेदवार निश्चित करून त्यांची उमेदवारी निश्चित केल्या जाईल अशी माहिती समिती मार्फत देण्यात आली. आदिवासी कृती समितीच्या उमेदवारामुळे पोफाळी निंगणुर आणि बिटरगाव या जिल्हा परिषद गटावर काय परिणाम पडेल ? हे पाहणे महत्त्वाचे ठरले.



# आमदार सुरेश धस यांच्या तत्परतेमुळे पाटोद्यातील आयेशा बेगम शेख यांना उपचारांसाठी मिळाला आधार

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून एक लाख रुपयांची मदत

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा शहरातील मुस्लिम मोहल्ला प्रभाग क्रमांक आठ येथील आयेशा बेगम मोहम्मद सुलेमान शेख या तरुण महिलेला अचानक मेंदूचा गंभीर आजार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. आयेशा बेगम यांचे पती मोहम्मद सुलेमान शेख हे शहरातील एका औषधी दुकानात कामगार असून, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे.

त्या मुळे उपचाराचा प्रचंड खर्च कसा भागवायचा, हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला होता. डॉक्टरांनी तपासणीनंतर आयेशा बेगम यांना अहिल्यानगर येथील मॅक्स केअर हॉस्पिटलमध्ये तातडीने मेंदूवरील शस्त्रक्रिया (Brain Surgery) करण्याचा सल्ला दिला. मात्र उपचाराचा खर्च लाखोंमध्ये असल्याने कुटुंब हतबल झाले होते. याची माहिती प्रभाग क्रमांक आठ चे नगरसेवक असिफ शेठ सौदागर यांना मिळताच त्यांनी तातडीने पुढाकार घेतला आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार सुरेश धस यांच्याशी संपर्क साधला. आमदार धस यांनी नेहमीप्रमाणे संवेदनशीलता दाखवत तातडीने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून मदतीचा प्रस्ताव सादर केला.



त्यांच्या प्रभावी पाठपुराव्यानंतर अवघ्या काही दिवसांतच मॅक्स केअर हॉस्पिटलच्या खात्यावर एक लाख रुपयांची मदत जमा करण्यात आली.

या मदतीमुळे आयेशा बेगम यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आणि शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, वेळेत मदत मिळाल्यामुळे रुग्णाचे प्राण वाचवणे शक्य झाले. या घटनेने पाटोदा शहरात आमदार धस आणि नगरसेवक आसिफ सौदागर यांच्या संवेदनशील कार्यशैलीची पुन्हा एकदा प्रचीती दिली आहे.

# शेख आमेर मैनुद्दीन यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** मुळचे बीड येथील रहिवासी व सध्या पाटोदा शहरातील क्रांतीनगर भागात स्थाईक असलेले शेख आमेर मैनुद्दीन यांचे दिनांक ०९/११/२०२५ रविवार रोजी वयाच्या ३७ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. दुपारी १:३० वाजता त्यांची पाटोदा येथील दर्गावाली मस्जीद कब्रस्थान येथे नमाजे जनाजा अदा (पठण) करण्यात आली व दफनविधी करण्यात आला. या वेळी पाटोदा शहरातील व परीसरातील नागरिक, नातेवाईक, आप्तेष्ट, हितचिंतक, मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. शेख आमेर मैनुद्दीन हे सर्वा मध्ये मिळुन मिसळून व सतत हसत मुख राहत असत त्यांच्या असे अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. शेख आमेर यांच्या मागे पत्नी, एक सात वर्षांचा मुलगा, पाच वर्षाची मुलगी, आई, शेख शारेख लहान भाऊ, सह इतर अशा परीवार आहे.



शेख आमेर हे परभणी जिल्हा भाजपा माजी महानगर अध्यक्ष अतीख पटेल व पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई यांचे भाच्चे होत. शेख परीवाराच्या दु:खात दैनिक युवक आधार परीवार सहभागी आहे.

# मतदार संघ बदलला तरी जनतेशी लोकप्रतिनिधीचं नातं जपणारे सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):-**

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री कै.डॉ. गणपतरावजी देशमुख यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व 11 वेळा करून एक राज्यांमध्ये उच्चांक गाठला होता हे उभ्या महाराष्ट्राला माहिती आहे. आणि त्यांची काम करण्याची पद्धत व कार्यकर्ते सांभाळायची पद्धत अनोखी होती. निवडणूक झाली ही कोण कार्यकर्ता असे आपणाला बऱ्याच वेळा पाहायला मिळते पण भाई गणपतरावजी देशमुख यांनी राजकारणामध्ये प्रवेश करत असतानाच कार्यकर्ता व जनता हेच माझे भांडवल हे म्हणून उभ्या हयातीत जनतेला आणि कार्यकर्त्याला अंतर दिले नाही. अशा या लोकप्रतिनिधीच्या हयातीनंतरही त्यांनी आपल्या राजकीय जीवनामध्ये ज्या मार्गांनी मार्गक्रमण केले आणि जनतेच्या हृदय सिंहासनावरती बसले याचा अभ्यासपूर्वक विचार करून व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून सांगोल्याची परंपरा जपण्यामध्ये सध्याचे सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख तसू भर मागे सरत नाही आणि स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांच्या विचाराचा वारसा घेऊन राजकीय वसा चालवत आहेत याचा सर्व कार्यकर्त्यांना व जनतेला वेळोवेळी अनुभव येत आहे पूर्वी सांगोला विधानसभा मतदारसंघांमध्ये माळशिरस तालुक्यातील 14 गावांचा समावेश होता. परंतु 2009 नंतर या 14 गावांचा समावेश माळशिरस मध्ये झाला. त्यानंतरही या 14 गावांच्या कार्यकर्त्यांच्या मताचा जरी आपल्याला उपयोग होणार नसेल तरीसुद्धा आबासाहेबांनी दिलेली परंपरा टिकवणे हेच आमचे कर्तव्य आहे असे म्हणून माळशिरस तालुक्यातील 14 गावांमध्ये कार्यकर्त्यांच्या आमंत्रणाला स्वीकारून जुन्या कार्यकर्त्यांच्या सहवासासाठी ते प्रत्येक कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहतात याची प्रचिती पिलीव तालुका माळशिरस येथील स्वर्गीय आबासाहेबांचे कार्यकर्ते आबासाहेब मुकिंदा शेंडगे यांच्या पुण्यस्मरणाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून मतदार संघाशी आता कसलाही संबंध नसताना देखील पूर्वी आपल्याला आपल्या आजोबांच्या काळामध्ये ज्या कार्यकर्त्यांनी ज्या जनतेने सहकार्य केलेला आहे त्याची जाणीव ठेवून या कार्यक्रमाला उपस्थित राहून जुन्या नव्या कार्यकर्त्यांशी सांगोल्याचे आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांनी आवर्जून उपस्थित राहून कार्यकर्त्यांशी व जनतेशी आपुलकीने संवाद साधून जुन्या व नव्या आठवणींना उजाळा दिला. या प्रसंगामुळे जुन्या नव्या कार्यकर्त्यांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण दिसून आले व पुन्हा एकदा आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या रूपाने आदरणीय भाई गणपतरावजी देशमुख साहेब आपल्या भेटीला आल्याचे अनेकांनी डोळ्यात अश्रू आणून आवर्जून सांगितले.



# आकुर्ली ते नेरे रस्त्याची दयनीय अवस्था

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** आकुर्ली ते नेरे रस्त्याची सध्या दयनीय अवस्था झाली असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. हे खड्डे प्रवाशांना, वाहन चालकांना त्रासदायक ठरत आहेत. संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर हे खड्डे बुजवावेत आणि रस्ता चांगला करावा अशी मागणी केली जात आहे.

येथील रस्त्यावर चिपळे, बोनशेत, कोप्रोली गावाजवळ मोठमोठे खड्डे पडले आहेत. पनवेल -माथेरान रोड परिसरात जाण्या येण्यासाठी मोठ्या प्रमाणात वर्दळ आणि वाहतूक होत आहे. दररोज मोठ्या प्रमाणात स्कुल व्हॅन, बसेस, रिक्षा, दुचाकी, कारने प्रवासी प्रवास करत असतात. या खड्ड्यांमुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी देखील होत आहे. आकुर्ली जवळ देखील एक मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यांमुळे वाहनांचे अपघात होत आहेत. त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. चिपळे, बोनशेत, भोकरपाडा जवळ मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांकडे प्रशासन लक्ष देत नाही. त्यामुळे नागरिकांची खड्ड्यातून प्रवास करताना त्रेधातीरपीट उडत आहे. खड्ड्यांमुळे अनेक अपघात देखील झाले आहेत. मात्र प्रशासनाला त्याचे काही सुयार सुतक नाही. खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत आहे. तसेच प्रवास करताना देखील उशीर होत आहे. या खड्ड्यातून प्रवास करताना प्रशासनाला रोज शिव्या शाप नागरिक आणि प्रवासी देत आहेत. येथील खड्डे लवकरात लवकर बुजवावेत अशा मागणीचे निवेदन शेकापचे माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आदित्य जानोरकर यांनी दिले आहे.





## डॉ.अनुजा बिनगे(गोरे) यांचा समाजोपयोगी उपक्रम

# माऊली हॉस्पिटलच्या पहिल्या वर्धापणा दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**परतूर- जालना(अशोक ठोके)**

दि.2 नोव्हेंबर 2025 रोजी माऊली हॉस्पिटलच्या प्रथम वर्धापन दिनानिम्मित मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आणि भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माऊली हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.अनुजा बिनगे (गोरे )यांनी मागील एका वर्षात हजारो रुग्णांच्या त्वचे बद्दलच्या आजारांवर तसेच सुंदर दिसण्यासाठी हजारों महिला आणि पुरुषांना योग्य ते उपचार देऊन त्यांना आनंदित केलेआहे. या शिबिराचे उद्घाटन परतूर डॉक्टर असोसिएशन कडून करण्यात आले. या शिबिरात 35 रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच जालना येथील जनकल्याण रक्तपेढी यांच्यामार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले .याप्रसंगी 20 रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य निभावले आणि डॉ. अनुजा बिनगे यांनी सर्व रक्तदात्यांचे मनापासून आभार मानले. या शिबिरासाठी समस्त परतूर डॉक्टर्स असोसिएशन शिबिरासाठी आवर्जून उपस्थित होते तसेच संभाजी नगर येथील डॉ. अर्जुन शिंदे, पानेवाडी येथील डॉ. आसेफ शेख, जालना येथील डॉ. विश्वंभर राठोड आदींची उपस्थिती देखील या शिबिरास होती. मागील एका वर्षात माहेर आणि सासर अशा दोन्ही ही परिवाराकडून मिळालेल्या सहकार्या बद्दल डॉ. अनुजा बिनगे यांनी परिवाराचे देखील आभार मानले.

